१९२३

म. ग्रं. सं. ठाणें

विषय प्रवास

सं. क्र. ७२

REFBK 0002415


REFBK-0002415

सं-भ्र-४८


REFBK-0002415

REFBK-0002415


## निर्यात माल.





## आयात माल.






## निरनिराळ्या धर्मांच्या लोकांचें परस्परांशीं प्रमाण.





## भाषा.




हिंदुस्तान
स्केल
पूर्व तुर्कस्तान
अफगाणिस्तान
हिंदुकुश पर्वत
तिबेट
मानस सरोवर
सांबर सरोवर
राजपुताना
सिंध
पंजाब
काश्मीर
बलुचिस्तान
सिंधु नदी
गंगा नदी
यमुना नदी
सतलज
रावी नं०
बियास नं०
काबुल नं०
खैबर घाट
मिथनकोट
धवलगिरि
गौरीशंकर
भूतान
बहार
आग्रा
संयुक्त प्रांत
मध्य हिंदुस्थान
ब्रह्मपुत्रा नं०
सांपू अ० ब्रह्मपुत्रा नं०




BHARAT PRINTING WORKS, 759 KASBA, POONA C[illegible]


हिंदुस्तानांतील
आगगाडीचे
रस्ते.
जोधपूर
बिकानेर
माळवा
राजपुताना
बडोदा
नागपूर रेल्वे
बंगाल नागपूर
मराठा रेल्वे
रुंद रूळ.
अरुंद रूळ

# भारत-परिचय

अथवा

## हिंदुस्तानचें नवीन भूवर्णन.


लेखक

रामचंद्र जनार्दन गोखले, बी. ए.,

शिक्षक, ट्रेनिंग कॉलेज फॉर मेन, पुणें.



प्रकाशक

लक्ष्मण नारायण गोडबोले,

बुकसेलर, बुधवार पेठ, पुणें.

अनंत सखाराम गोखले, यांनीं पुणें, पेठ शनवार

घ. नं. ५७० येथें 'विजय' छापखान्यांत छापिलें.

आवृत्ति पहिली—१९२३.

किंमत ६ आणे.

# सूचना.

(१) मुलांना इतर प्रदेशांविषयीं प्रथम जी जिज्ञासा व त्यांतील लोकांची राहणी–कपडे, खाणेंपिणें, व्यवसाय, घरें–य ही मुलांची जिज्ञासा तृप्त करण्यासाठीं माहिती देणें व ह्या अनुसरून आवश्यक भूगोलविषयक ज्ञान देणें ह्या तत्त्वास अनुसरून हें पुस्तक लिहिलें आहे.

(२) ह्या पुस्तकाच्या पहिल्या भागांत (पानें १ ते ५५) सांगितल्याप्रमाणें काल्पनिक प्रवासाची माहिती चित्रांच्या व नकाशाच्या साहाय्यानें मुलांना करवून द्यावी किंवा तो भाग वाचून दाखवून समजून सांगावा. नंतर

(३) ह्या वर्णनांत आलेल्या माहितीच्या साहाय्यानें ‘एकीकरण व सविस्तर माहिती’ हा भाग शिकवावा.

(४) शेवटीं दिलेल्या आकृतींचा उपयोग त्या त्या विषयासंबंधानें माहिती देतांना करावा.

आभार प्रदर्शन—प्रस्तुत पुस्तकांत ज्या लेखकांचे लेखांतून उतारे घेतले आहेत त्यांचा ग्रंथकर्ता फार आभारी आहे.

पुणें.
३० डिसेंबर १९२२.

ग्रंथकर्ता.

# हिंदुस्तानचें भूवर्णन

अथवा

## भारत–परिचय.



हिंदमाता.

2495

मुलांनो, आपणांस मुंबई इलाख्याची माहिती झाली आहे. आता आपण मुंबई इलाख्याजवळचे देश पाहूं ( शेवटीं नकाशांत पाहा).

हे देश मिळून जो एक मोठा देश झाला आहे त्यास हिंदुस्तान असें नांव आहे. स्तान=देश; हा देश हिंदूंचा म्हणून ह्यास हिंदुस्तान असें नांव पडलें आहे. ह्या देशांत आपण राहातों म्हणून हा आपला देश आहे. आईच्या दुधावर मूल जगतें, तसें आपण ह्या देशांत उत्पन्न होणाऱ्या पदार्थांवर जगतों, म्हणून हा देश आपणांस आई-सारखा आहे. सर्व लोक आपल्या देशास आई अथवा मातृभूमि असेंच म्हणतात. ( मातृ=माता किंवा आई; भूमि=जमीन, देश. ह्या मातेला उद्देशून एका कवीनें 'वंदेमातरम्' म्हणजे 'हिंदुस्तानरूपी आईला मी नमस्कार करतों' अशा अर्थाचा ज्याचा आरंभ आहे असें एक पद्य केलें आहे, तें तुम्हीं ऐकलें असेलच. ज्याप्रमाणें प्रत्ये-कास आपल्या आईचा अभिमान असतो त्याप्रमाणें आपणांस या आपल्या देशरूपी मातेचा अभिमान वाटतो व वाटला पाहिजे; आणि अभिमान वाटण्यासारखी या मातेची कीर्तिही आहे. कारण, जगास वंद्य (पूज्य) अशीं अनेक मनुष्यें या देशांत झालीं आहेत. या देशांतील विक्रम, अशोक यांसारखे महापराक्रमी व धर्मनिष्ठ (निष्ठा= भक्ति; धर्मावर ज्यांची निष्ठा ते धर्मनिष्ठ, म्हणजे धर्माप्रमाणें वाग-णारे) राजे, व्यास वाल्मिकी यांसारखे कवि व आपल्या बुद्धीच्या तेजानें जगाला दिपवून टाकणारे पाणिनि,* शंकराचार्य, भास्कराचार्य इत्यादि विद्वान् ग्रंथकार यांसारखीं माणसें फार थोड्या देशांत झालीं

*पाणिनीनें केलेल्या संस्कृत भाषेच्या व्याकरणासारखें व्याकरण तर जगांत कोठें आढळत नाहीं. अगदीं थोड्या शब्दांत पुष्कळ अर्थ यावा असे जे नियम केलेले असतात त्यांना सूत्रें म्हणतात. अशा, फार चातुर्यानें केलेल्या सूत्रांनीं पाणिनीनें आपलें व्याकरण बनविलेलें आहे. यांतील सूत्रें किती लहान पण किती अर्थ दाख-विणारीं असतात याचें एक उदाहरण पाहा. 'इकोयणचि' एवढ्या सूत्राचा अर्थ 'इई, उऊ, ऋॠ, ऌॡ, यांच्या पुढें निराळे स्वर आले असतां त्यांच्या जागीं अनुक्रमें य्, व्, र्, ल्, येतात' इतका आहे, ही किती आश्चर्याची गोष्ट आहे नाहीं? हा अर्थ कसा होतो हें तुम्ही समजावून घ्या म्हणजे तुम्हांला गंमत वाटेल.

आहेत. चिनी, ब्रह्मी वगैरे सुमारें चाळीस कोट लोकांचा जो बौद्ध नांवाचा धर्म आहे तो ज्या बुद्धानें स्थापिला (काढला) तोही याच देशांत जन्मला. अहिंसा म्हणजे प्राण्याचा जीव न घेणें हा बौद्ध धर्मांतील एक महत्त्वाचा नियम आहे. व्यासानें रचलेलें 'महाभारत' हें काव्य, कालिदासाचें शाकुंतल नाटक व भवभूतीचें उत्तररामचरित नाटक हे ग्रंथ जगांत अपूर्व आहेत. उत्तररामचरित नाटक वाचून जो अतिशय आनंद होतो, त्यानें ज्याचे डोळ्यांस पाणी आलें नाहीं असा मनुष्य विरळा. हें नाटक वाचून एका मोठ्या कवीस इतका आनंद झाला कीं, तो तें नाटक डोक्यावर घेऊन नाचला अशी कथा आहे. अशोक राजा फार पराक्रमी होताच पण त्याहीपेक्षां विशेष गोष्ट ही कीं, तो अत्यंत धार्मिक होता. एक देश जिंकला कीं, दुसरा देश जिंकावा अशी बहुतेक पराक्रमी राजांची इच्छा असते. अलेक्झँडर नांवाचा ग्रीक लोकांचा जो मोठा पराक्रमी राजा होऊन गेला त्याच्या संबंधानें अशी गोष्ट सांगतात कीं, अनेक देश जिंकल्यावर 'आतां जिंकावयास कांहीं राहिलें नाहीं' म्हणून त्याला फार दुःख झालें. परंतु अशोक राजानें मोठें राज्य मिळविल्यावर आणखी नवीन देश जिंकण्याचा लोभ न धरतां राहिलेलें आयुष्य परोपकाराचीं कामें करण्यांत घालविलें. त्यानें बौद्ध धर्माचा उपदेश करण्यास हिंदुस्तानाबाहेर लांब लांबच्या देशांत उपदेशक (म्हणजे उपदेश करणारे लोक) पाठविले व धर्मशिक्षण देण्यासाठीं ठिकठिकाणीं शाळा काढिल्या. त्यानें प्राण्यांची हत्या, म्हणजे खाण्याकरितां अगर शिकारीकरितां प्राणी मारणें, बंद केलें. त्यानें राज्यांत ठिकठिकाणीं विहिरी बांधल्या, झाडें लाविलीं, व औषधांसाठीं उपयोगीं पडणाऱ्या वनस्पतींच्या बागा तयार केल्या. त्यानें आपल्या राज्यांत माणसांसाठीं दवाखाने काढले होतेच; पण जनावरांसाठींही काढले होते. केवढा हा दयाळूपणा!

अशोकाप्रमाणें शिलादित्य हाही एक मोठा धर्मात्मा राजा हिंदुस्तानांत होऊन गेला. तो दर ५ वर्षांनंतर आपल्या संपत्तीचें दान करीत असे. ह्या दानसमारंभाचें वर्णन 'ह्युएन सँग' या चिनी प्रवाशानें पुढीलप्रमाणें केलें आहे.

"शिलादित्याच्या निमंत्रणावरून दूरदूरचे राजे व पंडित अलाहाबादेजवळ जमत. तेथें मोठा उत्सव होऊन सर्वांस मेजवान्या होत. उत्सवाचे वेळीं खजिना आणवून तो ब्राह्मण व बौद्ध भिक्षु यांना, भेदभाव न बाळगतां, राजा वांटीत असे. शेवटीं तो आपला मुकुट व जवाहीर काढून तें जवळच्या लोकांस देई व नंतर बुद्धाप्रमाणें कंथा म्हणजे गोधडी पांघरी!"

याप्रमाणें मोठमोठे अनेक लोक ह्या हिंदुस्तान देशांत होऊन गेले आहेत. असा हा जो देश त्यांतील निरनिराळ्या देशांसंबंधानें आपण माहिती मिळवूं.

आपण सिंधपासून जोधपूर-बिकानेर रेल्वेनें राजपुतान्यांतून जाऊं. ही रेल्वे जोधपूर ऊर्फ मारवाड या संस्थानांतून जाते म्हणून हिला हें नांव दिलें आहे. या रेल्वेच्या आसपासच्या प्रदेशांत गांवें किती कमी आहेत तें पाहा. याचें कारण काय असावें? एकाद्या प्रदेशांत वस्ती कमी असण्याला कारणें मुख्यत: पुढील आहेत:—(१) प्रदेश डोंगराळ असणें, (२) त्यांत जंगल अतिशय असणें, (३ पाण्याची कमतरता असणे. यांपैकीं येथें कोणतें कारण असावें? येथें पहिलें कारण लागू पडत नाहीं, कारण या प्रदेशांत डोंगर दिसत नाहींत. येथें दाट जंगलाचीही अडचण नाहीं. अर्थात् येथें वस्ती कमी असण्याच कारण येथील पाण्याची कमतरता. येथें पाऊस फार थोडा पडतो, नद्या ओढे अतिशय कमी, व विहिरींनाही पाणी जवळ लागत नाहीं. विहिरी वीस वीस पुरुष खोल खणाव्या, तेव्हां पाणी लागत. कांहीं

ठिकाणीं तर विहीर पन्नास पाऊणशें पुरुष खोल खणली तरी पाणी लागत नाहीं ! ( राजपुतान्याचा नकाशा शेवटीं पाहा.)

जोधपूर–बिकानेर रेल्वेनें जातांना आजूबाजूस पाहिलें तर वाळवंटाचे केवढे मोठे प्रदेश दृष्टीस पडतात ! मधून मधून शेतें व गवताचीं रानें आहेत, पण पुष्कळ प्रदेशांत वाळवंटेंच आहेत. उन्हाळ्यांत दोन प्रहरीं वाळवंट तापतें तेव्हां येथें उकाडा अतिशय होतो. तापलेल्या वाळवंटाकडे डोळ्यांनीं बघवत नाहीं. या वाळवंटांत मृगजळाचा चमत्कार दृष्टीस पडतो. ऊन प्रखर असतांना पाण्याचा भास होणें हा या चमत्काराचा मुख्य प्रकार होय. मृग म्हणजे हरीण; पाण्याच्या भासानें हरणें या खोट्या पाण्याकडे धावतात अशा कल्पनेवरून या चमत्कारास मृगजल हें नांव दिलें आहे. हा चमत्कार येथें चांगला दृष्टीस पडतो.

या राजपुतान्यांत पाऊस थोडा पडतो व जमिनींत पुष्कळ ठिकाणीं खोलपर्यंत वाळूच असते; यामुळें पावसाचें पाणी जमिनीवरून फारसें न वाहातां जमिनींत जिरून जातें. म्हणून पावसाचें पाणी जमिनीवरून ओढ्यानद्यांना फारसें मिळत नाहीं. या कारणानें वाळवंटाच्या प्रदेशांतील कांहीं नद्यांचे प्रवाह पुढें मोठे न होतां उलट लहान होत जातात व मध्येंच आटतात; म्हणजे ओढा अथवा नदी दुसऱ्या नदीस किंवा समुद्रास न मिळतां वाटेंतच नाहींशीं होते. असा चमत्कार आपल्या इकडे दृष्टीस पडत नाहीं. राजपुतान्यांतील कांहीं नद्यांच्या कांठच्या वाळवंटांतून जाणें फार धोक्याचें असतें. वाळू अतिशय बारीक व भुसभुशीत असते यामुळें त्यांतून चालणाऱ्या मनुष्यांचे किंवा जनावरांचे पाय वाळूंत रुततात. एक पाय वर काढावयास जावें तों दुसऱ्या पायावर जास्त भार पडून तो वाळूंत जास्त खोल जातो. हत्तीसारखीं जनावरें देखील वाळूंत रुतल्याचीं उदाहरणें आहेत. वाळवंटांतून चालतांना वाळूंत पाय रुतल्यामुळें चालणें मोठें त्रासाचें

असतें हें तुम्हांस माहीत आहे. वाळूंत पाय न रुतण्यास पाऊल बारीक असावें कीं थापटकें व रुंद असावें? रुंद. असें पाऊल कोणत्या जनावराचें असतें? असें पाऊल उंटाचें असतें. हा प्राणी ईश्वरानें



राजपुतान्यांतील वाळवंटांतून उंटांवरून प्रवास.

अशा देशांसाठींच उत्पन्न केला आहे असें वाटतें. याची मान लांब असते त्यामुळें गवत न मिळेल तेव्हां उंच झाडांचीं पानें त्यास खातां येतात. त्यास आपल्या नाकपुड्या झाकतां येतात म्हणून उष्ण वाळू व वारा यांपासून त्याला आपलें रक्षण करतां येतें. त्याचे गुडघ्याला स्वाभाविक मऊ गादी असते म्हणून त्यास वाळूंत गुडघे टेकतां येतात. उंटाचीं पावलें रुंद असल्यानें तीं वाळवंटांत रुतत नाहींत. तो एकदां पाणी प्याला म्हणजे १।२ दिवस नव्हे तर कित्येक दिवस त्यास पाणी प्यावयास मिळालें नाहीं तरी चालतें. म्हणून वाळवंटाच्या व कमी पाण्याच्या प्रदेशांतून प्रवास करण्यास उंट फार उपयोगीं पडतात.

वाळवंटांतून वाटेनें पाणी फार कमी. नदी, ओढा राहूं द्या पण कांहीं भागांत पांच पांच मैलांत विहीर दृष्टीस पडत नाहीं. शिवाय सर्व विहिरींचें पाणी गोडेंही नसतें. राजपुतान्यांत पाणी फार दुर्मिळ म्हणून तेथें हिंदूलोक पाण्यास विटाळ मानीत नाहींत. पाण्याच्या कमतरतेमुळें लोकांत स्वच्छताही कमी आहे.

रजपूत लोकांचा हा देश आहे म्हणून यास राजपुताना असें नांव पडलें आहे. रजपूत हा शब्द राजपुत्र ह्या शब्दापासून झालेला आहे. पूर्वी जे क्षत्रिय राजे होऊन गेले त्यांचे वंशज आपण आहोंत असे रजपूत राजे समजतात. शौर्य, इमानीपणा, उदारपणा, मानीपणा वगैरे गुणांसंबंधानें रजपूत लोकांची ख्याति आहे. शौर्य या गुणास रजपुतांमध्यें जितका मान आहे तितका तो फार थोड्या लोकांत आहे. जीव गेला तरी फिकीर नाहीं पण शत्रूला पाठ दाखवून परत येणें ही फार लाजिरवाणी गोष्ट ते समजतात. मागें एकदां जोधपूरचा राजा जसवंतसिंग पराभव पावून परत आपल्या राजधानीस आला तेव्हां राणी चंद्रावती इनें राजाला निरोप पाठविला कीं, 'पराभव पावून आलेल्या पतीस ( म्हणजे नवऱ्यास ) मी भेटूं इच्छीत नाहीं' व तिनें वेशीचे दरवाजे उघडूं नका म्हणून नोकरांना आज्ञा केली!

मारवाडी हे रजपूतच: राजपुतान्यांत मारवाड म्हणून एक देश आहे त्यांतील रजपूत व्यापाऱ्यांनाच मारवाडी म्हणतात. मारवाड्यांच्या दुकानांत 'धीरज बडी बात छे' म्हणजे धैर्य ही मोठी गोष्ट आहे, असें वाक्य भिंतीवर लिहिलेलें आढळतें. यावरून रजपुतांमध्यें धैर्यास मान किती आहे पाहा!



महाराणा प्रतापसिंह.

रजपुतांच्या शौर्याच्या गोष्टी अनेक आहेत, त्या 'वीरांच्या कथा' व 'राजस्थानचा इतिहास' या पुस्तकांत तुम्हांस वाचावयास मिळतील. त्या तुम्हीं अवश्य वाचाव्या.

राजपुतान्यांतील हें जयपूर शहर पाहा. याच्या इतकें व्यवस्थित शहर सर्व हिंदुस्तानांत नाहीं. त्यांतील रस्ते रुंद व अगदीं आखल्या:-प्रमाणें सरळ आहेत. घरेंही फार सुंदर आहेत. या शहराची रचना इतकी चांगली आहे कीं, एका युरोपियनास वाटलें कीं अमेरिकेंतील एकाद्या हुशार एंजिनियरानें त्याचा नमुना तयार केला असावा. पण हें शहर या संस्थानच्या सवाई जयसिंग या राजानें सुमारें २ शें वर्षांपूर्वीं वसविलें आहे. या राजाइतका विद्वान् राजा हिंदुस्तानांत काय पण इतर देशांत क्वचितच झाला असेल. जयसिंगानें गणित व ज्योतिष या शास्त्रांचा अभ्यास इतका उत्तम केला होता कीं, त्या वेळीं युरोपांतील एका मोठ्या विद्वान् गृहस्थानें तयार केलेल्या गणिताच्या ग्रंथांत त्यानें कांहीं सुधारणा करून दाखविल्या. ताऱ्यांचे वेध घेण्यासाठीं (वेध घेणें म्हणजे जागा अथवा स्थान बरोबर ठरविणें) उपयोगीं पडाव्या म्हणून त्यानें जयपूर येथें व दुसऱ्या शहरीं उत्तम वेधशाळा बांधिल्या.

आतां, आपण सिंध व पंजाब रेल्वेनें पंजाबांत जाऊं. ही रेल्वे सिंध व पंजाब यातून गेली आहे म्हणून हिला हें नांव आहे. ही हिंदुस्तानच्या वायव्य भागांतून गेली आहे व इंग्रजींत वायव्येस नॉर्थवेस्ट म्हणतात, म्हणून या रेल्वेस नॉर्थ वेस्टर्न ( म्हणजे वायव्येकडील ) रेल्वे असेंही नांव आहे. पंच=पांच; आब=नदी; या देशांत पांच मोठया नद्या आहेत ( त्या नकाशांत पाहा व त्यांचीं नांवें वाचा ) म्हणून या देशास पंजाब म्हणतात. पंजाबास तीन बाजूंनीं पर्वतांचा वेढा कसा आहे पाहा. हे पर्वत कोणकोणते आहेत ? ( नकाशा शेवटीं पाहा.)

पलीकडच्या अफगाणिस्तान, बलुचिस्तान वगैरे देशांतन हिंदुस्तानांत येण्यास या पर्वतांमधून वाटा म्हणजे खिंडी फारच थोडया आहेत. ह्या खिंडींपैकीं **बोलन व खैबर** या विशेष सोईच्या आहेत. तथापि ह्या खिंडी अरुंद असल्यामुळें आसपासच्या लोकांनीं खिंडींतून जाणाऱ्या लोकांना त्रास द्यावयाचें मनांत आणलें तर तें त्यांना सहज करतां येतें, म्हणन त्यांतून जाणें येणें फार अवघड आहे. मागें ( सुमारें पाऊणशें वर्षांपूर्वी ) एकदां इंग्लिशांचें सैन्य पलीकडच्या अफगाणिस्तान देशांत लढण्यास गेलें होतें. तें बोलन खिंडींतून परत येत असतां, खिंडीच्या दोहों बाजूकडील डोंगरांत लपून बसलेल्या अफगाण लोकांनीं वरून गोळया घालून किंवा धोंडे लोटून त्या सैन्याचा फार नाश केला. सैन्य व बरोबरचे नोकर मिळून सुमारें १० हजार लोक खिंडींत मेले !

वाटेनें कांहीं भागांत पाणी मिळणेंही फार कठीण आहे. ह्या वाटेनें जाणाऱ्यांपैकीं एका प्रवाशानें झालेल्या हालाचें वर्णन केलें आहे त्यांतील पुढील हकीगत पाहा. " सरहद्दीजवळ पाण्याची अडचण भासूं लागली. ६ पैसे देऊन एका माणसास पुरेल न पुरेल इतकें पाणी मिळे. पुढें........ला पोहोंचण्यापूर्वी एक मनुष्य व पोहोंचल्यानंतर दुसरा मनुष्य पाणी प्यावयास न मिळाल्यामुळें मेला."

ह्या वाटेनें इतक्या अडचणी आहेत ही गोष्ट एका प्रकारें फार




बोलन खिंड.

चांगली आहे. कारण ह्या योगानें दुसऱ्या लोकांना ह्या मार्गानें हिंदुस्तानावर स्वारी सहज करतां येणार नाहीं. खिंडीच्या तोंडाशीं व दोन्ही अंगांस थोडें सैन्य ठेवलें तर त्यास शत्रूच्या मोठ्या सैन्यासही अडवून धरतां येईल. वायव्येकडून हिंदुस्तानांत येण्याचे जे मार्ग आहेत त्यांच्या आसपासचा प्रदेश मिळून 'वायव्य सरहद्दीवरील प्रांत' झाला

[stamp]

आहे. यांत लष्करी छावण्या पुष्कळ ठेवल्या आहेत त्याचें कारण हेंच. या प्रांताची राजधानी पेशावर हें शहर आहे. खैबर खिंडीचे तोंडासमोर हें शहर असल्यामुळें हें फार महत्त्वाचें लष्करी ठाणें आहे.

जगांतील अतिशय सुंदर देशांपैकीं काश्मीर हा एक देश पंजाबचे उत्तरेस आहे. या काश्मिरांतील वनश्रीचा हा देखावा पाहा.



हिंदुस्तानचें नंदनवन–काश्मीर यांतील वनश्री.

ह्या वनांतील हे उंच सरळसोट वाढणारे देवदार, सफेता इत्यादि वृक्ष पाहा. सफरचंद, अक्रोड वगैरे फळझाडें या वनांत किती तरी आहेत!


काश्मीर देशाच्या बहुतेक बाजूस पर्वत आहेत. त्याच्या फक्त दक्षिणेकडील कांहीं भागांत पर्वत नाहींत. यांतून पलीकडल्या पूर्व--तुर्कस्तान या देशांत जाण्यास मार्ग फार थोडे आहेत.

ह्या पंजाब देशांत धुराळा किती आहे पाहा. असा धुराळा येथें नेहमीं असतो यावरून या देशांत पाऊस जास्त व वारंवार पडत असावा कीं कमी, व हवा दमट किंवा कोरडी याबद्दल काय समजून


येतें ? पाऊस पडल्यानें जमीन ओली होते. तसेंच हवा दमट असली म्हणजेही हवेंतील ओलाव्यामुळें जमीन किंचित् ओली होते. जमीन ओली असली म्हणजे तिजवरून वारा वाहिला असतां तिच्यावरील माती उडत नाहीं. घरांतील केर काढितांना, जमिनीवर थोडें पाणी शिंपलें म्हणजे धुराळा उडत नाहीं हें आपणांस माहीत आहे. यावरून समजून येईल कीं, जेथें पाऊस पुष्कळ पडून जमीन पुष्कळ ओली होते किंवा जेथें वारंवार पाऊस पडतो तेथें धुराळा फार उडत नाहीं.

पंजाबांतील मिठाचे डोंगर नांवाची ही डोंगरांची रांग पाहा. यांतून दरवर्षी दोन लाख खंडी मीठ निघतें. आपल्याकडे बाजारांत सैंधव अथवा शेंदेलोण म्हणून जो पदार्थ मिळतो तो ह्या खाणींतील मीठच होय. या खाणींत मिठाचे खडकच्या खडक आहेत ते फोडून त्यांतून मिठाचे मोटमोठे खडे काढतात. हें **कालाबाग** नांवाचें गांव मिठाच्या टेकडीवरच वसलेलें आहे. टेकडीमध्यें एकीवर एक अशा मोठमोठ्या पायऱ्या खोदून त्यांवर गांवांतील पेठा ( अथवा रस्ते ) वसविल्या आहेत. रस्ते एकामागें एक पायऱ्याप्रमाणें असल्यामुळें रस्त्यावरील एकाद्या घरांत शिरून त्याच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या मजल्यावर मागील दरवाजांतून बाहेर पडावें तों आपण मागील रस्त्यावर येतों !

पंजाबांत कालवे किती आहेत ते पाहा. ज्या प्रदेशांत हे कालवे आहेत त्यांत पाऊस थोडा पडतो. पिकांना पुरेसा पाऊस पडत नसल्यामुळें या प्रदेशांत पूर्वी पीक थोडें होत असे; परंतु हे कालवे झाल्यामुळें पुष्कळ जमिनींस ( पाऊण कोट एकर जमिनींस ) सुपीकपणा आला आहे. हल्लीं या प्रदेशांत २५ कोट रुपयांचा गहूं उत्पन्न होतो. यापैकीं बराच गहूं कराची बंदरांतून परदेशीं ( इंग्लंड वगैरे देशांत ) रवाना होतो. येथें गहूं ( हिंदुस्तानांतील इतर प्रदेशांचे मानानें ) फार स्वस्त मिळतो. पुण्यापेक्षां रुपयास ३।४ शेर गहूं येथें जास्त मिळतो.




पंजाबची राजधानी हें लाहोर शहर पाहा. हें रावी नदीवर आहे.



रणजितसिंगाचें थडगें.

**हें शहर शिखांचा प्रसिद्ध राजा रणजितसिंग याची राजधानी होतें. येथें त्याचें थडगें आहे. लाहोर येथील हा मजूर पाहा. याचें सर्व अंग**



पंजाबी मजुराचा हिंवाळ्यांतील पोषाख



पंजाबी मनुष्याचा उन्हाळ्यांतील पोशाक.

कपड्यांनीं आच्छादलेलें असून शिवाय त्यानें पांघरावयासही घेतलें आहे. पंजाबांत हिंवाळ्यांत थंडी फार असते म्हणून हिंवाळ्यांत लोकांचें सर्व अंग आच्छादलेलें असतें. हिंवाळ्यांत सकाळीं पाणी जवळ जवळ बर्फासारखें गार होतें. या दिवसांत उघड्या जागेवर निजणें धोक्याचें असतें. शेतांत उघड्यावर निजलीं माणसें थंडीनें


गारठून कधींकधीं मरतात. हिंवाळ्यांत सकाळीं दुकानांतून तूप आणण्यास भांड्याची जरुरी फारशी पडत नाहीं, कारण तें थंडीनें गोठून इतकें घट्ट बनलें असतें कीं, त्याचे खडे कागदांतून घरीं नेतां येतात! येथें हिंवाळ्यांत दिवस फार लहान होतो. सूर्योदय सकाळीं ८ वाजतां व सूर्यास्त सायंकाळीं ४॥ वाजतां होतो. पंजाबांतील मनुष्याचा उन्हाळ्यांतील पोशाक पाहा. अंगांत पातळ मलमलीचा झिरझिरीत सदरा व डोक्यावर पातळ टोपी आहे. याचें कारण काय? येथें उन्हाळाही फार असतो, व उन्हाळ्यांत दिवस फार मोठे असतात. सकाळीं ४ वाजतां दिसूं लागतें व संध्याकाळीं ८ वाजतांही पुस्तक वाचण्याइतका उजेड ( संधिप्रकाश ) असतो.

पंजाबांतील लोकांचें मुख्य खाणें म्हटलें म्हणजे पोळी व मुगाचें वरण. खाण्यांत भात थोडा. येथें तुरीचें वरण किंवा आमटी फारशी दृष्टीस पडत नाहीं.

लाहोरच्या दुकानांतील या शाली व गालिचे पाहा. या शहरांत फळांचीं, विशेषतः सुक्या फळांचीं, दुकानें किती आहेत पाहा. या दुकानांत डाळिंब, बदाम, पिस्तें, अक्रोड, अंजीर, मनुका, बेदाणा, जरदाळू, अलबुखार, नेजे ( एक प्रकारचीं सुकीं फळें ) वगैरे अनेक फळांचीं शिसरेंच्या शिसरें भरून ठेविलीं आहेत.

पंजाबमधील **धारिवाल** येथील ही लोंकरीच्या कापडाची गिरणी पाहा. पंजाबांत व पंजाबच्या शेजारचे काश्मीर, पूर्व तुर्कस्तान, तिबेट इ० डोंगराळ प्रदेशांत पुष्कळ गवताचीं रानें आहेत, त्यांत चरणाऱ्या मेंढ्यांपासून पुष्कळ लोंकर उत्पन्न होते. शिवाय या प्रदेशांत हिंवाळ्यांत थंडी फार असल्यामुळें ऊबदार कपड्यांची जरुरी येथील लोकांना विशेष आहे. या कारणानें लोंकरीचें कापड या प्रांतांत व आसपासचे प्रदेशांत फार होतें.

ह्या देशांत जिकडे तिकडे टांगे व घोडीं दृष्टीस पडतात. कांहीं



काचीचें ( फळें विकणाऱ्याचें ) दुकान.

कांहीं घोडे किती सुंदर व मजबूत आहेत ! घोडे इतके बळकट

असतात कीं, घोड्यांची एक जोडी टांगा घेऊन सुमारें ६ तासांत पन्नास मैलही जाऊं शकते.

पंजाबच्या वायव्य व पश्चिम भागांत राहाणाऱ्या लोकांपैकीं हा पठाण जातीचा इसम पाहा. हे लोक फार दांडगे व दंगेखोर आहेत. गांवर हल्ला करून घरें लुटणें, किंवा माणसें पळवून नेणें हा त्यांपैकीं कांहींचा (सर्वांचा नव्हे हें लक्षांत ठेवावें) धंदा आहे. यांचा दंगेखोरपणा मोडण्याचा प्रयत्न इंग्लिश सरकार करीत आहे. सरकारी कामगारांचीं हत्यारें लुटणें, हत्यारें गुप्त रीतीनें आणून विकणें हाही ह्या दंगेखोर लोकांचा एक धंदा आहे. त्या संबंधानें एक गमतीची गोष्ट सांगतात. एकदां बरेच पठाण लोक एक प्रेत घेऊन लांबच्या गांवास चालले होते. त्या प्रेताबरोबरचा मोठा जमाव पाहून पोलिसांनीं 'कोण मनुष्य मेला आहे' म्हणून चौकशी केली. चौकशींत कळलेल्या माहितीवरून संशय



पठाण.

आल्यामुळें 'प्रेत पाहिल्याशिवाय पुढें जाण्यास परवानगी देतां येत नाहीं,' असें सांगून प्रेत ठेवलेल्या तिरडीवर झांकण घातलेलें कापड थोडें बाजूला केलें तों आंत काय आढळून आलें? प्रेताच्या

जागीं बंदुकांची मोळी! अशा अनेक युक्त्या योजून हे लोक हत्यारांचा व्यापार करतात.

हा पंजाबांतील शीख पाहा. या जातीचे लोक मुख्यतः पंजाबांत आहेत. हे लढवय्ये म्हणून फार प्रसिद्ध आहेत. शंभर वर्षांपूर्वी पंजाबांत शीख लोकांचें राज्य होतें. त्यांना जिंकण्यास इंग्लिशांना जितके प्रयास पडले तितके हिंदुस्तानांतील दुसऱ्या कोणत्या लोकांना जिंकतांना पडले नाहींत. 'शीख शुद्ध राक्षसांप्रमाणें लढले' असें एका इंग्रज लेखकानें त्यांच्या लढण्याचें वर्णन केलें आहे. त्यांच्यामध्यें फंदफितुरी नसती, तर त्यांना जिंकणें इंग्लिशांना कठीण गेलें असतें. शीख किती धिप्पाड असतो तें पाहा.




शीख शिपाई.

पंजाबांतील बहुतेक लोक धिप्पाड असतात. तसेंच ते मुंबई इलाख्यांतील लोकांपेक्षां गोरे असतात. पंजाबांतील पैलवान सर्व हिंदुस्तानांत प्रसिद्ध आहेत. पंजाबी पैलवान गामा यानें मोठमोठ्या युरोपियन पहिलवानांनाही जिंकलें आहे.

हें **दिल्ली** शहर पाहा. येथील ही इमारत पाहा. हा सर्व हिंदुस्तान देशावरील मुख्य अधिकारी व्हाइसराय अथवा गव्हर्नर जनरल यांना राहाण्याकरितां बांधलेला सरकारी वाडा आहे. हें शहर १९१२ सालापासून हिंदुस्तानची राजधानी आहे. येथील जुम्मामशीद पाहा. येवढी दुसरी प्रचंड मशीद सर्व हिंदुस्तानांत नाहीं.

इंग्लिशांच्यापूर्वी ५।६ शें वर्षे हिंदुस्तानावर मुसलमान बादशाहा राज्य करीत होते. त्यांची राजधानी येथेंच होती. या बादशाहांनीं




जुम्मामशीद-दिल्ली.

बांधलेली ही मशीद आहे. हें हुमायून बादशहाचें दिल्लीजवळच थडगें केवढें भव्य आहे? अशा इमारती येथें कितीतरी आहेत! येथील किल्ला व किल्ल्यांतील 'दिवाणी आम' व 'दिवाणी खास' हे राजवाडे फार प्रेक्षणीय आहेत. दिल्लीपासून १० मैलांवर कुतुबमिनार म्हणून एक मनोरा आहे, तो पाहाण्यासारखा आहे. त्याची उंची ४० पुरुष (२३७ फूट) आहे. दिल्ली शहर ब्रिटिश हिंदुस्तानची राजधानी झाल्यापासून हें शहर व ह्याच्या आसपासचा थोडासा मुलूख मिळून एक निराळा प्रांत केला आहे.

पंजाबांतील शहरांतील घरें विटांनीं बांधलेलीं असतात. येथील घरांस दगडांचा उपयोग कमी केलेला असतो. याचें कारण काय असावें? येथें बहुतेक घरांवर गच्ची आहे. कौलारू छपरें येथें थोडीं दृष्टीस पडतात.

दिल्लीपासून सुमारें १० मैलांवर असलेली ही लोखंडाची लाट किंवा खांब पाहा. हा सुमारें एक हात जाड असून याची जमिनीपासून



लोखंडाची लाट.

उंची चार पुरुष आहे. हा सुमारें दीड हजार वर्षांपूर्वी तयार केलेला आहे. ह्या काळीं एवढी लोखंडाची लाट कशी तयार करावी याची माहिती दुसऱ्या कोणत्याही देशांत नव्हती. एका इंग्लिश लेखकानें म्हटलें आहे कीं, इंग्लंडमध्यें वाफेनें चालणारा घण किंवा हातोडा सुमारें शंभर वर्षांपूर्वी निघाला, त्यापूर्वी इंग्लंडांतही असली लाट तयार करतां आली नसती. इतकें अवघड काम ज्या प्राचीन हिंदू लोकांनीं केलें ते किती हुशार असले पाहिजेत ?

प्राचीन काळचे हिंदूलोक जसे हुशार होते तसे ते नीतिमान्‌ही होते. खोटें बोलणें, दुसऱ्याशीं लबाडी करणें हें त्यांच्याकडून बहुधा घडत नसे. ह्याविषयीं, ग्रीस नांवाच्या एका लांबच्या देशांतून मेग्यास्थिनीस नांवाचा एक गृहस्थ आला होता त्याचें म्हणणें पाहा. "गाहाणाबद्दल व ठेवीबद्दल त्यांच्या कधींही फिर्यादी होत नाहींत. ते आपल्या ठेवी एकमेकांच्या स्वाधीन खुशाल करतात. बाहेर जातांना घरांदारांस त्यांना कुलपें लावावीं लागत नाहींत."

पंजाबच्या बऱ्याच भागांत रेल्वेनें जातांना भोंवतालचा प्रदेश पाहिला तर नजर पोहोंचेपर्यंत सपाट मैदानें दिसतात. टेकडी क्वचित्‌ दृष्टीस पडते. वाटेनें घाट बहुतेक लागत नाहीं. हीच स्थिति वाटेनें कलकत्यापर्यंत दृष्टीस पडते.

आतां आपण औध–रोहिलखंड रेल्वेनें दिल्लीहून संयुक्त प्रांतांत

2794

जाऊं. औंध म्हणजे अयोध्या. ही रेल्वे अयोध्या व रोहिलखंड यांतून गेली आहे म्हणून हीस हें नांव दिलें आहे. या प्रांतांत नद्या किती आहेत पाहा. एवढ्या मोठ्या व इतक्या पुष्कळ नद्या दुसऱ्या प्रांतांत दिसतात काय? या सर्व नद्यांचा उगम कोणत्या पर्वतांत आहे? हिमालयांत. हा पर्वत किती लांब आहे पाहा. याच्या इतके लांब पर्वत जगांत फार थोडे आहेत. इतका उंच पर्वत जगांत दुसरा नाहीं. पर्वत फार उंच असल्यामुळें त्यास ओलांडून पलीकडील तिबेट देशांत जाणें फार कठीण जातें. हा पर्वत म्हणजे हिंदुस्तानच्या उत्तरेस एक फार प्रचंड तट आहे.

मागें एकदां एका हिंदुस्तानच्या बादशाहानें (महमद तघलख यानें) एक लक्ष सैन्य लांबचा चीन नांवाचा देश जिकण्यासाठीं पाठविलें होतें, त्यास हिमालय ओलांडून पलीकडे जातां आलें नाहीं. त्यांपैकीं बरेच लोक वाटेंत मेले.

ह्या हिमालयांत अनेक पवित्र नद्यांचे उगम आहेत व त्या उगमांचीं स्थानें पवित्र क्षेत्रें आहेत. ह्यांशिवाय **बद्रिनारायण, बद्रिकेदार** वगैरे हिंदूंचीं अनेक क्षेत्रें आहेत. या क्षेत्रांना दरवर्षी हजारों यात्रेकरू जातात. क्षेत्रांना जाण्याची वाट पहाडांतून व जंगलांतून आहे.

हिमालयाचें वर्णन निरनिराळ्या प्रवाशांनीं केलें आहे तें पाहा—

**हिमालयाचें स्वरूप—**

"हिमालय हा एक पर्वत नसून तो एकावर एक किंवा एकापुढें एक अशा हजारों वाकड्या तिकड्या पर्वतांच्या रांगा मिळून झाला आहे. यामुळें हिमालयाच्या शिखरास जाणें म्हणजे एक पर्वत चढावयाचा, तो उतरावयाचा; लगेच दुसरा चढावयाचा व तो उतरावयाचा; दोघांचे मध्यें नदी किंवा ओढा असेल तर तोही उतरावयाचा; असा नित्यक्रम चाललेला असतो. यामुळें शिखराकडे जाणाऱ्या प्रवाशास आपण चढत आहों कीं उतरत आहों, हें समजत नाहीं; पण

जातांना पाय भरून येतात व नद्या फार वेगानें खालीं वाहात असतात, यावरून आपण चढत आहों असें समजतें.

**हिमालयांतील प्रवास व वाटांचा अवघडपणा—**

"एक पहाड चढल्याबरोबर लगेच त्याच्याहीपेक्षां उंच असा दुसरा, व तो संपल्यावर तिसरा असे अनेक पहाड एकसारखे चढावे लागतात. येथें मधून मधून पाऊलवाटा आहेत. कांहीं वाटा इतक्या अवघड आहेत कीं, पुढें कांहीं अंतरावरून चालत असलेल्या लोकांकडे पाहिलें असतां आंगावर कांटा उभा राहून नारायणाचें स्मरण वारंवार होतें. असल्या अडचणीच्या प्रसंगीं 'बोलो बद्रीनाथकी जय' 'बोलो गरुड भगवान्‌की जय' 'बोलो केदारनाथ स्वामीकी जय' असला जयघोष यात्रेकरूंकडून मधून मधून होत असून त्याचा प्रतिध्वनि आसपासच्या पहाडांतून अनेकदां उठून तो पुष्कळ वेळ घुमत राहातो. पहाडाच्या शिखराजवळून सरासरी दोन हजार फूट सरळ तुटलेला कडा, आणि त्याच्या कांठावरून एक पावली वाटेनें एका ओळीनें जात असलेले यात्रेकरू; चालणारे प्रवासी आणि मृत्यु यांत अंतर दोन वितीचें; पाय घसरला, किंवा ठोकर लागली तर मनुष्याच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडून त्याचा पत्ता लागणें अशक्य; असा देखावा पाहून काय वाटत असेल याची कल्पनाच करावी! खालच्या बाजूला नजर फेंकली कीं डोळे फिरतात; खालून सोसाट्यानें वाहणारी मंदाकिनी नदी एकाद्या पांढऱ्या सापाप्रमाणें दिसते.

## हिमालयांतील प्रवास व वाटेनें दिसणारे सुंदर देखावे—

"चढून जसजसें वर जावें तसतसा हवेंत फार गारठा भासूं लागतो. बर्फाचे पहाडही सन्निध दिसतात. पहाटें आठ नऊ वाजेपर्यंत सूर्यदर्शन होत नाहीं. वाटेनें गर्द झाडी असल्यामुळें सूर्योदय झाल्याचेंही लवकर दृष्टोत्पत्तीस येत नाहीं. रस्त्याच्या दोन्ही बाजूंच्या वृक्षांच्या खांद्या परस्परांत गुंतल्यामुळें लांबच लांब कमानदार गुंफा बनलेली असते. त्यांतून गळलेल्या कुसुमरेणूंनीं (फुलांच्या परागांनीं) सर्व मार्ग आच्छादिलेला असतो. मधून मधून गुलाबाचे ताटवेच्या ताटवे लागून गेल्यामुळें दिशा सुगंधानें भरून गेलेल्या असतात. गुलाब आणि तो इतका विपुल, हें प्रथम खरेंच

वाटत नाहीं. (गुलाबाचीं फुलें शुभ्र एकेरी पांच पाकळ्यांचीं असून त्यांचा सुगंधही आपल्याकडल्यापेक्षां बराच कमी असतो.) त्यांवर भुंग्यांचे थवे निरंतर गुंजारव करीत त्यांतील मध पीत बसलेले आढळतात. गुलाबाप्रमाणें इतरही झाडें पुष्कळ आहेत. कोसचा कोस ही वनशोभा सारखी लागलेली आहे. आतां एक देखावा तर पुढें दुसरा अगदीं निराळ्या प्रकारचा; पण शोभेंत खंड म्हणून नाहींच. आतां जर चित्रविचित्र फुलांनीं सुशोभित अशी लांबच्या लांब गुंफा असली, तर पुढें रस्त्याच्या वरील पहाडांत आणि खालीं नदीपर्यंत खोल दरींत अनेक प्रकारच्या फर्न्स अथवा नेचे या सुशोभित वनस्पतींचा अफाट बगीचा दिसतो. पुढें जावें तर मोठमोठे अक्रोड, देवदार वगैरे विशाल वृक्ष पर्वताच्या शिखरांशीं उंचींत चढाओढ करतांना दिसतात. कुसुमगुच्छांनीं (फुलांच्या भारांनीं) नटलेल्या अनेक प्रकारच्या सुंदर वेली, मंद वायूच्या झुळकेंत डुलूं लागल्या म्हणजे वनदेवता फुलांनीं गजबजलेल्या वेलींच्या झोंपाळ्यावर बसून झोके घेत आहेत असा भास होतो. ही वनशोभा पाहून मन फार उल्लसित होतें आणि आपण किती वाट चालून आलों याचें भान देखील राहात नाहीं.

**हिमालयावरील जंगल—**

"मार्गांतून वृक्षांची इतकी गर्दी आहे कीं, खालची दरी किती खोल आहे तें देखील समजत नाहीं. जणू काय खालीं हिरव्या पानांचा समुद्र आहे असें वाटतें.

' या जंगलांत शें पाऊणशें फूट उंचीचे मोठमोठे वृक्ष आहेत. वृक्षांच्या गर्द पालवीचें हिरवें गार छत वरतीं पसरलेलें असून त्यांतून भर दुपारचेंही सूर्यकिरण पडण्यास तिळमात्र जागा नाहीं. आपल्यावर जणू काय वृक्षांनीं छत्रच धरलेलें आहे असें वाटतें. वृक्षांवर वीत दोन वीती शेवाळ वाढून तें त्यांच्या खांद्यांवरून केसांच्या झुपक्याप्रमाणें लोंबत असल्यामुळें जटाभार वाढवून तप करीत बसणाऱ्या साधूंप्रमाणें ते दिसतात. त्यांच्या शांततेचा भंग होऊं नये म्हणूनच की काय तेथील सृष्टि अगदीं शांत आहे. वायूची गति मंद आहे,

पक्ष्यांचा किलकिलाट नाहीं व निर्झर ( पाण्याचे प्रवाह ) देखील अगदीं गुपचूप आपला मार्ग आक्रमण करीत आहेत. जणू काय ईश्वराचें चिंतन करण्यांत अखिल सृष्टि ध्यानस्थ आहे. मधून मधून जमिनीवरील वनस्पतींना पांढरीं, तांबडीं, पिवळीं, जांभळीं वगैरे रंगांचीं लहान लहान असंख्य फुलें आलेलीं असल्यामुळें रस्त्याभर जणू काय चित्रविचित्र रंगांचा बहुमोल सुंदर गालीचा पसरल्याप्रमाणें शोभा दिसते. हीं कोमल फुलें पायांखालीं तुडवीत जावें लागल्यामुळें भारी वाईट वाटतें. आपल्या चारही दिशांना सारखें वृक्षांशिवाय दुसरें कांहीं दिसत नसल्या-मुळें आपण पर्वताच्या शिखरावर आहोंत किंवा पहाडापासून बरेच लांब सपाटी-वर आहोंत हें मुळींच दिसत नाहीं. आठ दहा हातांवरील आपले सोबती झाडींत गडप झाल्याप्रमाणें दिसेनासे होतात. एकट्या माणसाला येथें भीतीच वाटावयाची.

## हिमालयांतील प्रदेशांची रम्यता—

" ह्या ठिकाणावरून उभें राहून सभोंवार नजर फेंकली असतां दिसणाऱ्या मनोरम देखाव्याची आठवण जन्मांत कोणी कदापि विसर-णार नाहीं. मेघमालेच्या पलीकडे आपले बाहु पसरणारे अनंतकोटि विशाल वृक्ष, या देवभूमीचें पावित्र्य ( पवित्रपणा ) दर्शित करणारें शुभ्र हिम, आपल्याखालीं बऱ्याच अंतरावर, हिमराजाच्या कटि-प्रदेशावर, मेखलेप्रमाणें ( कमरपट्ट्याप्रमाणें ) विराजमान ( शोभायमान ) होऊन आसमंतांतील सर्व प्रदेशाला गुरफटून टाकणारें मेघपटल ( ढगांचा पडदा ), दीडदीडशें फूट उंचीवरून गर्जना करीत कोसळ-णारे अनेक निर्झर इतकें साहित्य सृष्टिदेवतेनें आयतें तयार ठेवल्यावर असा कोण दैवाचा करंटा आहे कीं, ज्याचें अंतःकरण प्रफुल्लित होणार नाहीं? आप्त, इष्टमित्र, गोत सोडून अत्यंत कष्ट सोशीत जे परमेश्वराच्या पायीं आपलें आयुष्य अर्पण करून इकडील रानावनांत तपाचरण करितात, त्यांचा परामर्ष ( समाचार ) घेण्याकरितां भगवंतानें आपली गृहलक्ष्मी जी सृष्टि तिची योजना केली आहे. ह्या निर्जन वनांत ती आपल्या प्रिय पुत्रांना अमृततुल्य कंदमुळांचें भोजन घालून स्फटिकासारख्या निर्मळ निर्झरांतील जलाचें पान करविते.

रात्रीं विश्रांति घेण्याकरितां तिनें जागोजाग गुहारूपी शय्यामंदिरें ( निजण्याच्या खोल्या ) निर्माण करून ठेविलीं आहेत. त्यांतील वाळलेल्या वृक्षपर्णांच्या मऊ बिछान्यावर खुशाल झोंपीं जा. वारा, ऊन, पाऊस, थंडी हीं तेथें बाधणार नाहींत. निरनिराळ्या पुष्पांचा आमोद ( सुगंध ) वायूच्या लहरींवर आरोहण करून संतांचा शोध करीत साऱ्या प्रदेशभर सदैव हिंडून त्यांना तृप्त करीत असतो. पूर्ण स्वातंत्र्याचें साम्राज्य जर कोठें पृथ्वीवर असेल तर तें येथें आहे.

**हिमालयावरील अरण्यांतील कांहीं झाडांचें वर्णन—**

"**भूर्जवृक्ष**–हिमालयावरील जंगलांत भूर्ज नांवाचीं झाडें फार आहेत. यांची साल पातळ असते व ती सहज काढतां येते. या सालीस भूर्जपत्र म्हणतात. हिमालयांत जीं गांवें आहेत त्यांतील दुकानांतून भूर्जपत्रांचा उपयोग आपलेकडील कागदांप्रमाणें करितात. हें भूर्जपत्र रेशमाप्रमाणें चकाकदार आणि मृदु असून त्याचे पडद्यांवर पडदे असतात. हीं पत्रें झाडांच्या सालीचे पडदे म्हणजे पदर होत. इकडे भोजनास पत्रावळीप्रमाणें भूर्जपत्रांचा उपयोग करतात. कोणतीही वस्तू द्यावयाची असल्यास ती त्यांतच बांधून देतात. या भूर्जवृक्षांचीं इकडे मोठमोठीं जंगलें असून त्यांत भूर्जपत्र इतकें विपुल मिळतें कीं, भांडीं घासण्यास आणि घरें शाकारण्यासही त्याचा उपयोग करतात. घरांवर सागवानाचे पानांप्रमाणें हीं भूर्जपत्रें घालून घरें शाकारतात. रामानें वनवासास जातांना भूर्जपत्राचींच वल्कलें धारण केलीं होतीं, असें म्हणतात.

"**सुरू**–येथें मार्गांत एकजात सुरूचे वृक्ष आहेत. हीं सुरूचीं झाडें तोडून त्याचे रेल्वेचे स्लीपर ( रुळाखालीं रस्त्यावर आडवीं घातलेलीं लाकडें ) करण्याचे या बाजूस लहान मोठे बरेच कारखाने आहेत. लाकडें कापून स्लीपर करावयाचे, नदीला पूर आला म्हणजे ते नदींत सोडावयाचे व ते नियमित ठिकाणीं काढून घ्यावयाचे, कांठाला लागून ते अडकूं नयेत म्हणून ठिकठिकाणीं लोक ठेवावयाचे, याप्रमाणें स्लीपर वाहून नेण्याची व्यवस्था असते. ह्या मार्गाशिवाय हें नेण्याचें दुसरें कांहींच साधन नाहीं. या सुरूचे झाडांपासून तेहरी संस्थानास फार उत्पन्न आहे. येथें हे वृक्ष आपोआप उत्पन्न होतात. कांहीं वृक्ष एवढे मोठे आहेत कीं, त्यांचे बुंधे दोनदोन तीनतीन वावेंत देखील मावणार नाहींत.

**हिमालयांतील मेघांचा चमत्कार—**

"हिमालय चढतांना आपण ढगांच्या जवळ जातों. अशा वेळीं चोहोंकडून धुकें आणि मेघ यांनीं सर्व प्रदेश व्याप्त होऊन वृक्ष, दऱ्या, पर्वत, सर्व कांहीं त्यांत गुरफटून जातें, व मागें पुढें खालीं वर एका भस्मी पडद्याशिवाय दुसरें कांहीं दिसत नाहीं. खालीं रस्त्याच्या बाजूला दरी असून त्यांत कांहीं वृक्षांसारखें आहे हें आपणांस माहीत असतें; पण खालीं दरी किती खोल आहे अगर वर पहाड किती उंच आहे हें मुळींच दिसत नाहीं. आकाश आणि पृथ्वी शुभ्र सूक्ष्म पदार्थांनीं एकमय होऊन त्यांत पहाड-पर्वत, झाडें-झुडें, जीवजंतु, दरेखोरें सर्व कांहीं लुप्तप्राय (दिसेनाशीं) होतात. पांच दहा हातांवरील वस्तुही दिसत नाहीं. ऐन मध्यान्हीं अंधेर पडल्याप्रमाणें दिसतें व मेघ आणि धुकें यांचा बेमालूम मिलाफ झाल्यामुळें आपण मेघांत आहोंत कीं, धुक्यांत आहोंत हें कळणें कठीण पडतें.

**हिमालयांतील प्रवाहांचा उपयोग—**

"येथें जोरानें वाहाणाऱ्या पाण्याचें साहाय्य घेऊन चालविलेल्या लाकडें कातण्याच्या गिरणींत केलेल्या लाकडाचे पेले, बशा, कमंडलू वगैरे नाना तऱ्हेच्या सुबक वस्तु फारच स्वस्त मिळतात.

## हिमालयांतील बर्फ—

" जे पहाड ओलांडले त्यांच्याही शिखरांवर बर्फ दिसलें. या बर्फांतून, त्याला अग्नि लाविल्याप्रमाणें, निघत असलेला धूर पाहून मोठें नवल वाटतें. येथें उन्हाचे योगानें चित्रविचित्र रंगांच्या बर्फाच्या शिलांचे जे देखावे दिसतात ते अपूर्व आहेत. त्यांचें वर्णन करतां येणें शक्य नाहीं. केव्हां बर्फावर चकचकीत ऊन पडून चोहोंकडे लखलखाट होतो, तर केव्हां आकाश ढगांनीं भरून जाऊन काळोख पडतो, व केव्हां बर्फावर दाट धुकें पडून बर्फ, धुकें आणि ढग यांचा बेमालूम एकजीव होऊन बर्फ संपून मेघ कोठें सुरू होतो हें स्पष्ट दिसत नाहीं.

"हिमालय चढतांना अनेक वेळां ४०।५० फूट रुंद असे हिमाचे थर ओलांडून पुढें जावें लागतें. हें हिम जमिनीसारखें घट्ट आहे; तें कधींच निःशेष वितळून जात नाहीं. कोठें मार्गांतून हिम साफ वितळल्यामुळें

त्याच्या ठिकाणीं खोल दऱ्या बनलेल्या असतात. मार्ग पहाडाच्या कडेनें फक्त वीत वीत जागेंतून गेलेले असून वर पाहावें तों बर्फाचा कडा तुटलेला दिसतो व त्यांतून थेंब थेंब पाणी ठिपकत असतें. पहाडाच्या शिखरापासून खालीं गेलेले हे लांबच्या लांब हिमाचे पाट बर्फाच्या नद्यांप्रमाणें भासतात. एके ठिकाणीं तर हा थर १०० फूट रुंद व २००।४०० फूट लांब होता.

**हिमालयाच्या कांहीं भागांचें भिन्न स्वरूप—**

"कांहीं डोंगर अगदीं उघडे बोडके आहेत; वनस्पतींचा लेशही नाहीं. उन्हामुळें थकवा आल्यास विश्रांति करतां बसण्यास सावलीची जागा नाहीं व पिण्यास पाणीही नाहीं.

**हिमालयांतील देखावे—**

"**विष्णुगंगा व अलकनंदा यांचा संगम**—येथें विष्णुगंगा आणि अलकनंदा मोठमोठ्या पहाडांच्या उतरणीवरून भीषण (भयंकर) गर्जना करीत मोठ्या वेगानें धाड-धाड धावत येऊन एकमेकींस कडकडून आलिंगन देतात. संगमस्थानीं त्यांचें पाणी सपाटीपेक्षां कित्येक हात उंच उसळून त्यांच्या फवाऱ्यांतील सूक्ष्म जलतुषार सूर्यकिरणांत जांभळ्या, निळ्या, अस्मानी, हिरव्या, पिवळ्या, नारिंगी आणि तांबड्या अशा इंद्रधनुष्याच्या सप्त रश्मींनीं (किरणांनीं) नानातऱ्हेच्या रत्नांप्रमाणें प्रकाशमान होऊन उंच खडकाच्या सुळक्यावरून ही शोभा प्रसन्न चित्तानें अवलोकन करणाऱ्या पथिक जनांचें अंतःकरण आणि शरीर आपल्या सुखस्पर्शानें गारेगार करून सोडतात.

**हिमालयांतील चमत्कार—बद्रिनारायणाजवळील उन्हाळीं.**

"इतके कष्ट करून थंडींतून आलेल्या यात्रेकरूंचे श्रम हरण करण्याकरितां या हिमानें व्याप्त अशा ठिकाणीं तप्त कुंडासारखी अजब चीज निर्माण करून ठेविली आहे. पिवळ्या गोमुखांतून हत्तीच्या सोंडेसारखी मोठी उष्णोदकाची धार कुंडांत अहोरात्र अखंड पडत असते. धारेचें पाणी अत्यंत उष्ण असून त्याचे चटके बसतात, पण कुंडांत पडून तें थंड हवा लागल्यामुळें निवून स्नानाला योग्य होतें. यावरून उष्ण उष्ण वाफेचा ढग सारखा हेलकावे खात असतो. कुंडांतील पाणी थोडें अधिक खोल असून त्यांत बुडी (गोता) मारल्याबरोबर दीड महिन्याच्या कठीण यात्रेचा शीण एका सेकंदांत पार नाहींसा होऊन माशा

मच्छरांच्या चाव्यांमुळें उत्पन्न झालेली कंडू व फोड एकदम शमल्याप्रमाणे वाटतात. या पाण्यांत गळ्यापर्यंत बुडतें रहाण्यांत अशी मौज वाटते कीं, ती वर्णन करवत नाहीं. अर्धा अर्धा तासपर्यंत बाहेर यावेंसें वाटत नाहीं.

"जम्नोत्री येथें चार पांच कुंडें एकापेक्षां एक तप्त आहेत. आंतून कढत पाण्याच्या उकळ्या येत असतात. तीं इतकीं तप्त आहेत कीं, आंत तांदुळाची पुरचुंडी बांधून ठेवली असतां भात शिजून निघतो किंवा रोटी फडक्यांत बांधून सोडिली असतां ती उकडून निघते! येथें कुंडांत शिजविलेला भात वाळवून ठेविल्यास पुष्कळ दिवस टिकतो. त्यास विटाळ नाहीं व तो प्रसादाकरितां घेऊन जातात!

### हिमालयांतील चमत्कार–चमकणारे दगड.

"खरसाळीपर्यंतच्या मार्गांतील कांहीं दगड इतके तेजस्वी आहेत कीं, सोन्यारुप्याचा रस करून त्याचे येथें दगड बनविले आहेत कीं काय असा भास होतो. जसजसें जम्नोत्रीजवळ जावें तसतशी मातीसुद्धां त्याच रसाची केलेली आढळते. सर्व खडक, डोंगरही रत्नांचेच बनविले आहेत असा भास होऊन आपण कुबेरनगरीला जात आहों कीं काय असें वाटतें.

## हिमालयांतील राहणी–थंडी.

"........येथें सात आठ महिने बर्फ असतें. तीन चार महिनेच लोकांस घराबाहेर पडवतें व त्याच महिन्यांत काय ती जमीन लावून शेती होते. एरवीं थंडीमध्यें दरवाजे लावून आंत आगटी पेटवून रातंदिवस घरांत राहावें लागतें.

## उंच प्रदेशांतील थंड हवा—

" बायका, पुरुष, मुलें अगदीं लोंकरीच्या लठ्ठ लठ्ठ कपड्यांनीं मढविलेलीं असतात, हा येथील उन्हाळ्याचा प्रकार! मग थंडीच्या दिवसांत राहाणारांची काय स्थिति होत असेल याची कल्पना करावी.

"हिमालयांतील प्रदेशांत घरांवर छप्पर दगडी चिपांचें करितात. या चिपा मातींत बसवितात. सर्व हिमालयभर हा पऱ्या दगड असल्यामुळें सर्वत्र शाकारणी याचीच करतात. स्लेटपाटी करणारी एकादी कंपनी येथें निघाल्यास तिला फार फायदा होईल.

## उंच भागांतील घरें—

"या प्रदेशांतील घरांमध्यें कलाकौशल्य कमी पण मजबुती चांगली असते. जसजसें हिमालयाच्या जवळ जावें, तसतशीं थंडीच्या बचावाकरितां म्हणून दारें व खिडक्या कमी. येथून पुढें थंडी फार म्हणून घराला एकच दार असतें व तेंही अगदीं लहान म्हणजे दोन फूट रुंद इतकेंच असतें! खिडक्या मुळींच नाहींत व आंत एक धुमी असते! दिवसासुद्धां दिवा घेऊन फिरावें लागतें.

### उंच भागांतील चमत्कार—

" हिमालयांतील त्रिजुगीनारायण हें स्थान अत्यंत उंच असल्यामुळें येथील हवा सपाटीवरील प्रदेशापेक्षां पुष्कळ विरळ होते; व त्या योगानें हवेचा दाब कमी होऊन पाणी १०० अंशांच्या खालींच उकळूं लागतें. पाण्यावरील हवेचा दाब अगदीं नाहींसा केला, तर शून्य अंशावर देखील तें उकळूं लागेल हें पदार्थविज्ञानशास्त्रांतील तत्त्व सर्वांनाच माहीत नसेल. अर्थात् कमी उष्णतेनें उकळूं लागणाऱ्या पाण्यांत उष्णताही बेताचीच असावयाची. तेव्हां त्यांत अन्न लवकर शिजत नाहीं. शिवाय येथें थंडी मनस्वी असून पाणी गार असतें हेंही दुसरें एक कारण आहेच. आधणांत तेल तूप टाकूनही येथें बटाटे आणि तुरीची डाळ शिजत नाहींत.

## लोकांचा प्रामाणिकपणा—

" हिमालयांत राहाणाऱ्या लोकांमध्यें प्रामाणिकपणा फार आहे. एकाद्या प्रवाशाचा एकादा जिन्नस वाटेनें हरवला तर तो कोणीही उचलून नेत नाहीं. तो प्रवासी फिरून तेथें जाईपर्यंत तो जिन्नस तेथेंच पडून राहातो. हिमालयांतील कांहीं दुकानांतील जिन्नस विकण्यासाठीं क्वचित् प्रसंगीं मनुष्यही नसतो. एका काठ्यांच्या दुकानाचें वर्णन पाहा.

"एका दुकानांत सुंदर तऱ्हेतऱ्हेच्या काठ्या ठेवल्या असून 'काठीचे मुठीवर चिकटविलेली किंमत काठीच्या फळीवर ठेवून काठी उचलून न्यावी' अशा सूचनांचे तक्ते लाविले असून दुकानांत कोणी दिसत नव्हतें.

**लोकांच्या चाली—**

"क्षत्रिय गळ्यांत जानवें घालतात व मासे धरतात. येथें मासे पकडणाऱ्या लोकांचे थवेच्या थवे दृष्टीस पडतात. जणू काय मोठा बाजार भरलेला आहे. प्रत्येकाच्या ढुंगणाला लंगोटी, एका हातीं माशांची टोपली व दुसऱ्या हातीं जाळें परंतु गळ्यांत जानवें घातलेलें पाहून मोठी मौज वाटते. महाराष्ट्रांत यांना धीवर (मासे धरणारे कोळी) म्हणून कोणी शिवणार नाहीं. पण इकडील ब्राह्मण त्यांना क्षत्रिय म्हणून त्यांची मुंज करितात, आणि त्यांच्या हातचें अन्न खातात. इकडे ब्राह्मण आणि क्षत्रिय या दोनच जाती असून रोटीपाणी आणि स्पर्शास्पर्शाचें बंड नाहीं.

"जेवण झाल्यावर खरकटें झाडून काढतात. शेण मुळीं लावीतच नाहींत आणि मिळणार कुठें ! फार स्वच्छता करावयाची असल्यास मातीनें सारवतात किंवा गंगोदक शिपतात.

**प्राणी. धनगरी कुत्रे—**

"येथें धनगरांजवळ मेंढयांचे मोठमोठे कळप आहेत. एकेका कळपाबरोबर त्याच्या संरक्षणार्थ तीन चार कुत्रे असतात. ते असले म्हणजे जनावरांची काळजी नाहीं. हा कुत्रा इतका भयंकर असतो कीं, हिंस्र पशूप्रमाणें त्याच्याकडे पाहावत नाहीं. तो भुंकूं लागला असतां सर्व अरण्य दुमदुमून जातें.

"इकडील कुत्रेही दिसण्यांत भयंकर, भव्य आणि सुंदर असतात. तो त्याचा वाघासारखा जबडा आणि त्यावरील लांब आयाळीसारखे केंस पाहिले कीं, 'त्यांच्यापुढें जाण्याची कोणाची छाती नाहीं. त्यांची उंचीही या त्यांच्या आकृतीला शोभण्यासारखी अस्वलाइतकी असून, अस्वलाप्रमाणेंच दीड दीड वीत लांब त्यांच्या अंगावर मऊ केंस व शेवटीं झुपकेदार शेपटी असते. असला एकादा प्राणी जर झाडींत गुहेशेजारीं बसलेला आढळला तर वाघाचा भास होऊन विलक्षण घेघा उडेल. परंतु आकृतीप्रमाणें हे कुत्रे बहुधा द्वाड नसतात.

**माशा—**

सर्व हिमालयाभर माशांचा उपद्रव फार आहे. कांहीं पदार्थ उघडा पडला किंवा शरिराचा भाग उघडा पडला कीं, यांचा घोळका जमलाच !

**विंचवाचीं झाडें—**

"हीं आपल्याकडल्या कुइलीसारखीं असतात. आपल्याकडील कुइली अंगाला लाविली कीं, जशी कंड सुटते त्याच्यापेक्षां याचा फणकारा मोठा आहे. कइलीचें

पान हातावर घासावें लागतें व जेथें केंस नाहीं तेथें तिचा कांहीं परिणाम होत नाहीं. तसें ह्या विंचवाच्या झाडाचें नाहीं. शरीराच्या कोणत्याही भागाला याचा स्पर्श झाला असतां विंचू चावल्याप्रमाणें तीव्र वेदना होतात; असा फणकारा बसला म्हणजे स्वाभाविक कोणी तरी चावल्याचा भास होतो." †

हिमालयांतून निघणारी ही गंगा नदी पाहा. या गंगेच्या कांठीं अनेक क्षेत्रें आहेत. गंगेचा उगम हिमालयांत ज्या ठिकाणीं होतो, त्यास गंगोत्री म्हणतात. गंगेच्या कांठचें दुसरें मोठें क्षेत्र **हरद्वार** अथवा **हरिद्वार.** शंकराचे भक्त या क्षेत्रास हरद्वार (हर म्हणजे शंकर) व विष्णूचे भक्त हरिद्वार ( हरि म्हणजे विष्णु ) म्हणतात. हरद्वार येथें गंगेचें पाणी भिंगाप्रमाणें स्वच्छ आहे. एक पुरुष खोल पाण्यांतील तळचे गोटे वरून स्पष्ट दिसतात !

हरद्वार येथील **गुरुकुल** नांवाची शाळा पाहाण्यायोग्य आहे. येथील शिक्षण व व्यवस्था आपल्या इकडच्याहून फार निराळी आहे. या शाळेंत मुलाला दहाव्या वर्षापूर्वी घेतात व पालकाकडून असा करार करून घेतात कीं, पंचविसावे वर्षापर्यंत त्याचें लग्न करावयाचें नाहीं. येथील मुलांची राहणी अगदीं साधेपणाची व आंगांत कंटकपणा उत्पन्न करणारी असते. पहाटें उठून थंड पाण्यानें स्नान करावें लागतें. जेवणखाण अगदीं साधें असतें. कपडेही अगदीं बेताचे वापरावयाचे असतात. येथील विद्यार्थ्यांना संस्कृत शिकावें लागतें एवढेंच नव्हे, तर वरच्या वर्गांतील मुलांना संस्कृतमध्यें बोलावेंही लागतें. आठवड्यांतून एकदां बुधवारीं एकाद्या विषयावर संस्कृतांत वादविवाद होतो त्याचें वर्णन पुढीलप्रमाणें एका गृहस्थांनीं केलें आहे.

"विद्यार्थी संस्कृत अस्खलित ( न अडखळतां ) बोलत होते हें पाहून आम्हांस फार कौतुक वाटलें. त्यांचे ते ब्रह्मचाऱ्यास (ब्रह्मचारी म्हणजे विद्या शिकणारा

† वरील उताऱ्यांपैकीं कांहीं रा. रा. गो. ह. फडके यांच्या 'माझी तीर्थयात्रा' या लेखांतून व बाकीचे रा. रा. रामेकर यांच्या 'श्रीबदरीकेदारयात्रावर्णन' या लेखांतून घेतले आहेत.

अविवाहित विद्यार्थी ) योग्य असे पिवळे पोशाक, त्यांचें सतेज, निरोगी, सुदृढ शरीर, त्यांच्या चेहऱ्यावर दिसून येणारा तेज:पुंजपणा व आनंद आणि त्यांचें संस्कृत भाषण हीं पाहून असा भास झाला कीं, आपण पूर्वीच्या काळच्या एकाद्या वसिष्ठ-वाल्मिकीच्या आश्रमांत असून तेथले हे ऋषिकुमार बोलत आहेत कीं काय ! ”‡

ही शाळा महात्मा लाला मुनशीराम नांवाच्या गृहस्थांनीं काढली. या शाळेसाठीं त्यांनीं रात्रंदिवस अनेक वर्षें श्रम केले, एवढेंच नव्हे तर आपली वकिलींतली महिना हजाराची प्राप्ति सोडून आपली सर्व मालमिळकत या विद्यालयाला अर्पण केली आहे. केवढें औदार्य व थोरपणा ! म्हणूनच यांना महात्मा मुनशीराम असें कांहीं लोक म्हणतात.

या संयुक्त प्रांतांत कालवे बरेच आहेत व ते मोठे आहेत. ( शेवटीं आकृति पाहा.) नद्या व कालवे पुष्कळ असल्यामुळें हा देश फार सुपीक आहे. जिकडे पाहावें तिकडे शेतेंच शेतें दृष्टीस पडतात. माळ किंवा टेकड्या येथें थोड्या दृष्टीस पडतात.


येथें जेवणास जितका खर्च येतो तितका कमी खर्च हिंदुस्तानांत दुसऱ्या कोणत्याही ठिकाणीं येत नसेल. कारण जमिनीच्या सुपीकपणामुळे गहूं व इतर धान्यें येथें फार स्वस्त मिळतात. येथें देशी साखरही बरीच स्वस्त आहे. कारण ती या देशांत बरीच उत्पन्न होते. ही साखर आपल्याकडे थोडीशी येते. तिला बनारशी साखर असें म्हणतात. बनारस म्हणजे काशी. महाराष्ट्रांतून काशीस जाणाऱ्या लोकांच्या दृष्टीस ही साखर बनारस येथें पडते म्हणून, किंवा ती बनारसकडून आपल्या इकडे येते म्हणून हीस बनारशी असें नांव पडलें आहे.

येथें भाजीपाला, दूधदुभतेंही स्वस्त आहे. हंगामांत एक आण्याला मोठा थोरला कोबीचा गड्डा मिळतो. दुधाचीं दुकानें शहरांतून थोडथोड्या अंतरावर असतात. दूध पिणें व तालीम करणें हा

‡प्रोफेसर भाटे यांचा ‘ उत्तर हिंदुस्तानांतील प्रवास.’

शौक येथें बऱ्याच लोकांना असतो. धान्याच्या स्वस्ताईमुळें येथें गडी, शिपाई वगैरेंना पगार फार द्यावा लागत नाहीं.

ह्या प्रांतांतील **कानपूर** येथील ही लोंकरीचे कापडाची गिरणी व बुटांचा कारखाना पाहा. येथें गिरणींत कापसाचें कापडही तयार होतें. येथील हा साखरेचा कारखाना पाहा असे कारखाने या प्रांतांत पुष्कळ आहेत. येथें आगगाडीचे रस्ते किती मिळाले आहेत ते पाहा. दरवर्षी पाव कोट किंमतीचें कापड व लाखों रुपयांचे बूट, जोडे वगैरे सामान या कारखान्यांतून तयार होतें. सरकार सैन्यासाठीं दरवर्षी येथीलच बूट विकत घेतें. येथें तंबू फार तयार होतात. इतके तंबू हिंदुस्तान देशांत दुसऱ्या कोणत्याही ठिकाणीं तयार होत नसतील.





हें **अलाहाबाद** शहर पाहा. हें संयुक्तप्रांताची हल्लींची राजधानी आहे. गंगा व यमुना ह्या नद्यांचे संगमाजवळ हें शहर असल्यामुळें हिंदू लोक यास फार पवित्र मानतात. येथें दरवर्षी माघपौर्णिमेस मोठी यात्रा जमते. कधीं कधीं येथें १०—१५ लक्ष यात्रा जमते. ह्या शहरास हिंदू लोक **प्रयाग** असें म्हणतात, व हेंच ह्या शहराचें पूर्वीचें नांव आहे. 'अलाहाबाद' (अल्लाह=देव; आबाद=शहर; अलाहाबाद=देवाचें शहर) हें नांव अकबरानें दिलें. आग्र्याचे पूर्वेस **काशी** ऊर्फ **बनारस** हें हिंदूंच्या सर्व क्षेत्रांमध्यें अतिशय पवित्र व प्रसिद्ध आहे. येथें हिंदूंच्या देवतांचीं हजारों देवळें आहेत व गंगेच्या कांठीं मोठाले घाट बांधलेले आहेत.

काशी या शहरीं हीं नऱ्हेतऱ्हेचीं तांब्यापितळेच्या भांड्यांचीं व

रेशमी कापडाचीं दुकानें किती आहेत! कद, पितांबर, रेशमी लुगडीं यांची दुकानांत गर्दीच्या गर्दी आहे.

येथील ही जंतरमंतर नांवाची इमारत पाहा. आकाशांतील गोलांचें (व चांदण्यांचें) स्थान बरोबर मोजतां यावें यासाठीं ही इमारत बांधलेली आहे. हीस वेधशाळा म्हणतात. ही सवाई जयसिंग नांवाच्या जयपूर संस्थानच्या राजानें बांधिली.

काशीजवळून वाहाणाऱ्या गंगानदीचा देखावा पाहा. गंगानदीस




हिंदू लोक फार पवित्र मानतात. तिच्या पाण्यांत स्नान केल्यानें सर्व पातकें नाहींशीं होतात अशी बहुतेक हिंदूंची समजूत आहे. यामुळें हजारों नव्हे तर लाखों लोक दरवर्षीं गंगेच्या स्नानास लांबलांबच्या ठिकाणांहून येतात. इतर नद्यांनाही हिंदू लोक पवित्र समजतात; पण त्यांचा पवित्रपणा गंगेपेक्षां कमी मानला जातो.

नद्यांना पवित्र मानण्याची चाल आहे ती उगीच नाहीं. जिवंत राहाण्यास लागणाऱ्या अत्यावश्यक वस्तूंपैकीं पाणी ही एक आहे. मनुष्य अन्नावांचून वेळेनुसार १०।२० दिवस जगूं शकतो, पण

पाण्यावांचून तो २।३ दिवसही जिवंत रहाणार नाहीं. तहानलेल्या मनुष्यास पाण्यानें किती आनंद होतो ! पाण्यानें होणारा आनंद व पाण्याची जीवनास आवश्यकता हीं लक्षांत घेऊनच पाण्याला जीवन असें नांव दिलें आहे. इतकी महत्त्वाची व नित्य लागणारी वस्तु जें पाणी तें माणसांना मुख्यतः नदीपासून मिळतें. अंगाची व कपड्यांची स्वच्छता राखण्यास पाणीच उपयोगीं पडतें. शेतें पिकविण्यासही नदीच्या पाटांचें व कालव्यांचें पाणी उपयोगीं पडतें. ह्याप्रमाणें नदीचा फार उपयोग आहे म्हणून तिला पवित्र मानतात. दुसऱ्या एका कारणास्तवही नदी पूज्य वस्तु आहे. वृद्ध म्हणजे पुष्कळ वयाच्या माणसास पूज्य मानण्याची चाल आहे. या दृष्टीनें पाहिलें तर ह्या पृथ्वीवर नदीइतक्या वयाची दुसरी वस्तु पर्वताशिवाय क्वचितच सांपडेल. लेणीं व कांहीं देवालयें शेंकडों वर्षांचीं जुनीं आहेत म्हणून त्यांना आपण प्राचीन म्हणतों. ह्या देवालयांच्या पूर्वी पांडव कौरव झाले. राम रावण हे त्यांच्या पूर्वी झाले, आणि हिंदूंचे मूळ धर्मग्रंथ जे वेद ते त्यांच्याही पूर्वी झाले. म्हणून आपण वेदांना फार प्राचीन म्हणतों; पण वेदांचा प्राचीनपणा नद्यांच्या प्राचीन-पणापुढें कांहींच नाहीं. वेद झाल्यास कांहींच्या मतें ४ हजार तर कांहींच्या मतें दहा हजार वर्षें झालीं आहेत. पण नद्या उत्पन्न होऊन लाखों वर्षें झालीं आहेत. नद्यांच्या दृष्टीनें पृथ्वीवरील फार प्राचीन माणसें, आजोबाच्या दृष्टीनें नुकत्याच जन्मलेल्या तान्ह्या मुलांप्रमाणें आहेत. कारण पृथ्वीवर कोणीही मनुष्य नव्हता तेव्हांपासून नद्या वाहात आहेत. त्यांनीं आजपर्यंत कौरव पांडवांसारख्यांचीं हजारों युद्धें पाहिलीं आहेत. ह्याप्रमाणें नद्या फार उपयोगी व प्राचीन म्हणून पूज्य आहेतच; पण त्यांत गंगानदी हिंदूंना विशेष पूज्य आहे. विद्वान् लोकांची अशी कल्पना आहे कीं, प्राचीन काळीं हल्लीं जेथें संयुक्त प्रांत, बहार व बंगाल आहेत तेथपर्यंत पूर्वी हिंदी महा-

सागर पसरला होता. अर्थात् त्या वेळीं गंगानदी हिमालयाच्या पायथ्या जवळच्या समुद्रास (कोंकणांतील नद्या सह्याद्रीच्या पायथ्याशीं असलेल्या समुद्रास मिळतात त्याप्रमाणें) मिळत असावी, म्हणजे हल्लीं कलकत्त्या जवळ गंगेचा गाळ सांचून बनलेल्या सुंदरबनासारखा प्रदेश त्या वेळीं हिमालयाच्या पायथ्याशीं असावा. हल्लीं गाळ सांचून सुंदरबनाचा प्रदेश वाढत चालला आहे, त्याप्रमाणें हिमालयाच्या पायथ्याजवळ गंगेचा व इतर नद्यांचा गाळ सांचून बनलेला प्रदेश क्रमाक्रमानें वाढत जाऊन संयुक्तप्रांत, बहार, बंगाल ह्या प्रदेशांतील जमीन तयार झाली. ह्या प्रदेशांत पाण्याचा पुरवठा गंगेकडूनच ( व हिमालयांतील इतर नद्यांकडून ) होतो. ह्याप्रमाणें ह्या प्रदेशांची उत्पत्ति व पोषण गंगेकडून झालें आहे. ह्यास्तव गंगानदी ह्या प्रदेशांची आईच आहे. यावरून गंगेला ( व त्याप्रमाणें इतर नद्यांनाही ) लोक गंगामाता म्हणतात हें योग्यच आहे असें तुम्हांस दिसून येईल.

गंगानदी विशेष पवित्र वाटण्याचें दुसरें कारण प्राचीन काळचे मोठमोठे ऋषि व पुण्यवान् माणसें तिच्या कांठच्या प्रदेशांत राहात होतीं. ह्या गंगेनें हिंदुस्तानचा सर्व इतिहास पाहिला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. एकवचनी व एकबाणी राम, महासाध्वी सीता, व भगवान् श्रीकृष्ण यांस गंगेनें पाहिलें आहे व त्यांच्या स्नानानें ती पवित्र झाली आहे. पांडवांपैकीं धर्मात्मे भीष्म व धर्म ह्यांचा तिच्या तीरीं वास झाला आहे. पुराणांतील पुष्कळ पुण्यश्लोक (पुण्य=पवित्र; श्लोक=कीर्ति; पुण्यश्लोक=पवित्र कीर्तीचे ) राजेही गंगेच्या तीरावर राहात होते. व्यास, वाल्मिकी यांसारखे अतिप्राचीन महर्षि व गदाधरभट्ट व गागाभट्ट यांसारखे प्राचीन पंडित गंगेच्या कांठच्या क्षेत्रांतच राहात होते. बरेच अर्वाचीन पंडितही गंगेच्या कांठच्या क्षेत्रांतच झाले आहेत. याप्रमाणें गंगेचा कांठ हजारों सत्पुरुष व साध्वी स्त्रिया यांच्या सहवासानें पवित्र झाला आहे. गंगेच्या कांठचा सगळ्या शहरांचा व

क्षेत्रांचा इतिहास म्हणजे हिंदू लोक, हिंदू धर्म व संस्कृत विद्या यांचा इतिहास होय.†

येथें व या प्रांतांत सर्वत्र मुख्य अन्न पोळी म्हणजे गव्हाची भाकर. भात थोडा खातात व तोही जेवणाच्या शेवटीं. गरीब लोकही पोळी खातात. कारण इकडे गहूं फार पिकतो.

आतां आपण लखनौ शहरीं जाऊं. ज्यांत मुसलमानांची वस्ती जास्त आहे अशा प्रदेशाची राजधानी **लखनौ** हें शहर होतें. त्यामुळें ह्यास हिंदुस्तानांतील मुसलमानांचें मुख्य शहर असें म्हणतां येईल. या शहरांत रेशमी व जरीचीं वस्त्रें, कशीद्याचें काम, ऐटदार टोप्या व जोडे, मोठ्या किंमतीच्या गुडगुड्या इत्यादि अनेक चैनीचे व कलाकौशल्याचे किती तरी पदार्थ तयार होतात.

---

†गंगा नदी इतकी पवित्र असल्यामुळें हिंदू लोक तिला देवता मानतात व तिची स्तुति अनेक कवींनीं अनेक कवितांतून केली आहे. देवतांची स्तुति करणाऱ्या कवितेला स्तोत्र म्हणतात. गंगेच्या स्तोत्रांपैकीं वाल्मिकी ऋषींनीं केलेलें स्तोत्र फार प्रसिद्ध आहे व बरेच हिंदू लोक तें सकाळीं नित्य म्हणतात. या स्तोत्रांत गंगेला पृथ्वीचा हार, स्वर्गांत जाणाऱ्यांची पताका, पातकांचा नाश करणारी वगैरे अनेक विशेषणें लाविलीं आहेत. हें स्तोत्र संस्कृत भाषेंत आहे व तें तुम्हांस समजण्यासारखें नसलें तरी त्यांतील शब्दांची रचना इतकी उत्तम आहे कीं, तें न समजतां म्हटलें तरी तुम्हांस मौज वाटेल. उदाहरणार्थ स्तोत्रांतील पुढील श्लोक पाहा

पतत्तालतमालशालसरलव्यालोलवल्लीलता
च्छन्नं सूर्यकरप्रतापरहितं शंखेन्दुकुन्दोज्ज्वलम् ।
गंधर्वामरसिद्धकिन्नरगणैर्देवर्षिभिर्वंदितं
स्नानाय प्रतिवासरं भवतु मे गांगं जलं निर्मलम् ॥
गांगंवारि मनोहारि मुरारिचरणच्युतम् ।
त्रिपुरारिशिरश्चारि पापहारि पुनातु माम् ॥
पापापहारि दुरितारि तरङ्गधारि। शैलप्रचारि गिरिराज गुहाविदारि ॥
झंकारकारि हरिपादरजोऽपहारि । गांगं पुनातु सततं शुभकारि वारि ॥

लखनौभोंवतालचा प्रदेश ( अयोध्या प्रांत ) अतिशय सुपीक आहे. जिकडे तिकडे मळे व शेतें दृष्टीस पडतात, म्हणून यास ' हिंदुस्तानचा बगीचा ' असें नांव कांहींनीं दिलें आहे.

आतां आपण ईस्ट इंडिया रेल्वेनें बहार प्रांतांतून जाऊं. या प्रांतांतील गंगेच्या कांठचें **पाटणा** शहर पाहा. हें या प्रदेशांतील मुख्य शहर आहे. प्राचीन काळीं पाटलीपुत्र म्हणून या देशाची जी राजधानी होती तेंच हें शहर होय असें म्हणतात.

प्राचीन काळीं प्रसिद्ध असलेलें ' **नलंद** ' नांवाचें शहर पाटणा शहराजवळ होतें. येथील विद्यापीठ ( म्हणजे कॉलेज अथवा शाळा ) फारच प्रचंड होतें. त्यांत १० हजार विद्यार्थी नित्य राहात असत व त्यांना शिकविण्यासाठीं मोठमोठे पंडित ठेविले होते. या शाळेचा खर्च चालण्यासाठीं जवळच्या २शें गांवांचें उत्पन्न राजानें दिलें होतें. या ठिकाणीं शिकण्यासाठीं हजारों कोस लांब असलेल्या तिबेट, चीन वगैरे देशांतूनही विद्यार्थी येत असत.

आतां आपण ईस्ट इंडिया रेल्वेनें बंगालमध्यें जाऊं. पंजाबांतून बंगालमध्यें आगगाडीनें जाण्यास एक दिवसाहून म्हणजे चोवीस तासांहून जास्त वेळ लागतो. ही आगगाडी तासास सुमारें तीस मैल जाते. यावरून पंजाबपासून बंगाल किती लांब असला पाहिजे बरें ?

या बंगाल देशांतही नद्या पुष्कळ आहेत त्या पाहा. त्यांपैकीं दोन फार मोठ्या आहेत. वाटेनें आपणांस **शोण** नदी लागते ती केवढी मोठी आहे ! ज्या नदीचा प्रवाह फार मोठा असतो तीस नदीऐवजीं नद हा पुल्लिंगीं शब्द कधीं कधीं लावतात. म्हणूनच सिंधु, शोण, ब्रम्हपुत्रा या प्रचंड नद्यांना सिंधुनद, शोणनद, ब्रह्मपुत्रा-नद असेंही म्हणतात. या शोणनदीवरील पूल किती लांब आहे ? याची लांबी पुरे दोन मैल आहे. इतका लांब पूल हिंदुस्तानांत दुसरा कोठेंही नाहीं.

बंगालमध्यें कालवे पुष्कळ आहेत. यावरून या देशाच्या सुपीक-पणासंबंधानें आपणांस काय कळतें ?

बंगालमधील मुख्य शहर कलकत्ता पाहा. येथें प्रचंड इमारती किती आहेत ! हें हिंदुस्तानांतील अत्यंत मोठें शहर असून १९१२ सालापूर्वी हिंदुस्तानची राजधानी होतें. हें मोठें बंदर असून एथून दरवर्षी १०० कोट रुपयांचा माल रवाना होतो. ह्या शहरांतील भव्य व सुंदर इमारतींमुळें यास राजवाड्यांचें—हवेल्यांचें—शहर असें नांव युरोपियन लोकांनीं दिलें आहे.

हे पाहा बंगाली गृहस्थ. याप्रमाणें पुष्कळ बंगाली गृहस्थ रस्त्यानें बोडकेच फिरतात. कांहीं लोक कधीं कधीं डोक्यास टोपी किंवा फेटा घालतात. पण रस्त्यानें बोडक्यानें हिंडण्याची चाल बंगालमध्यें फार आहे.



बंगाली गृहस्थ.

बंगाल देश फार सधन आहे म्हणून येथील प्रख्यात वकिलांना पैसेही फार मिळतात. राश बिहारी घोस ह्या वकिलांनीं दिलेल्या देणग्यांपैकीं एक २० लाख रुपयांची आहे. कांहीं दिवसांपूर्वीं नेमलेले बहार-ओरिसा प्रांताचे गव्हर्नर लॉर्ड सिंह हे पूर्वीं बॅरिस्टरचा धंदा करीत होते तेव्हां त्यांना महिना २५।३० हजार रुपये मिळत असत ! सरकारी मोठमोठ्या नोकऱ्यांवर बंगाली लोक जितके आहेत तितके दुसऱ्या कोणत्याही जातीचे हिंदू लोक नाहींत.

बंगाली लोक बुद्धिमान् म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांच्यामध्यें विद्वान् लोक फार आढळतात. शास्त्रीय शोधक जगदीश चंद्र बोस व कवि रवींद्रनाथ टागोर यांचा लौकिक हिंदुस्तानांतच नव्हे, तर सर्व युरोपियन

लोकांत झाला आहे. बंगाली लोक वक्ते म्हणूनही नाणावलेले आहेत; न अडखळतां सभेंत भाषण करण्याची कला त्यांच्यांत फार आढळून येते. त्यांचीं नांवें नाटकें, कादंबऱ्या यांतील नांवांप्रमाणें झोकदार असतात; उदाहरणार्थ पुढील नांवें पाहा:–प्रफुल्लचंद्र चक्रवर्ती, मणींद्र-चंद्र नंदी, सुरेंद्रनाथ, भूपेंद्रनाथ, देवी सुवर्णमयी, मनमोहन घोस, श्यामसुंदर चक्रवर्ती, प्यारीलाल इ०.

ह्या देशांतील **डाका** शहर पूर्वी मलमलीविषयीं फार प्रसिद्ध होतें. मलमल म्हणजे कापसाचें फार पातळ कापड. हें कापड इतकें पातळ असे कीं, मोठ्या मनुष्याच्या धोतराएवढ्या मलमलीच्या कापडाची घडी लहानशा खिशांत सहज मावत असे. मात्र या कापडास किंमत फार पडे.

बंगाली लोकांचें मुख्य अन्न भात हें होय.

कलकत्ता येथील ही ज्यूटची गिरणी पाहा. आपण ज्या पोत्यांत धान्य ठेवतों तीं या गिरणींत तयार होतात. ज्यूट हा तागासारखा असतो. त्याचें या गिरणींत गोणपाट नांवाचें कापड तयार करतात. आपल्या इकडील बहुतेक पोतीं या कापडाचीं केलेलीं असतात. बंगालमध्यें दरवर्षी कोट्यवधि पोतीं तयार होतात.

कलकत्ता येथील ही कागदाची गिरणी पाहा. या गिरणींत दरवर्षी लाखों रुपयांचा कागद तयार होतो. कागदाची गिरणी येथें काढण्यास एक सोय आहे. कागद तयार करण्यास कापडाच्या किंवा कागदाच्या चिंध्या लागतात, अथवा ताग, वाख यांसारखे तंतु लागतात. येथें गोणपा-टाच्या ज्या गिरण्या आहेत त्यांत ज्यूटचा दोरा तयार केल्यावर ज्यूटचा जो गाळ राहातो त्याचा कागद करण्याच्या कामीं फार चांगला उपयोग होतो.

कलकत्ता स्टेशनवरील सुपारीच्या पोत्यांचे हे ढीग पाहा.

कलकत्त्यास व बंगालच्या बऱ्याच भागांत घरें विटांचीं असतात. घरें बांधण्यास दगडांचा उपयोग फार कमी. याचें कारण काय

असावें? बंगाल देश हा गंगा व तिला मिळणाऱ्या नद्या व त्यांत वाहून जाणारें पाणी यांबरोबर आलेल्या गाळानें बनलेला आहे. हा गाळ हजारों वर्षें सांचत आल्यामुळें त्याचा जाड थर बंगालमध्यें सर्वत्र आहे. कलकत्याजवळ दोनतीनशें फूट खोल खणलें तरीही ह्या गाळाशिवाय दुसरें कांहीं (खडक) लागत नाहीं. म्हणून या भागांत दगडांची फार कमतरता आहे. असें सांगतात कीं, मद्रासहून गलबतांतून व आगबोटींतून धोंडे भरून कलकत्यास नेतात!

हें कलकत्याचें बंदर पाहा. येथून या आगबोटी दुसऱ्या देशास जावयास निघाल्या आहेत. त्यांत काय काय माल भरला आहे? गहूं, तांदूळ, ज्यूट, गोणपाट, जवस, चहा, थोडेंसें कापड इ०.


तसेंच येथें या आगबोटी जपान, इंग्लंड वगैरे देशांहून आल्या आहेत त्यांत काय माल आला आहे पाहा. अनेक प्रकारचें कापड व सूत; लोखंडाचे, तांब्याचे व पितळेचे पत्रे, खिळे, स्क्रू, यंत्रें वगैरे धातूंचें सामान; साखर, राकेल इ०.

येथें गंगानदींतून एका विशेष प्रकारच्या आगबोटी सारख्या जात येत असतात याचें कारण काय? या आगबोटी नदींतील गाळ काढीत आहेत. नदी एवढी मोठी दिसते तरी तिचें पाणी फार खोल नाहीं. आगबोटीचा २।४ पुरुष उंचीचा भाग पाण्यांत बुडलेला राहातो म्हणून तिला ३।४ पुरुषांपेक्षां जास्त खोलीचें पाणी लागतें. तितकें खोल पाणी नसेल तर आगबोट पाण्याच्या तळच्या मातींत रुतते. या गंगानदीच्या पाण्याबरोबर पुष्कळ गाळ येतो व येथें प्रवाह फार संथ असल्यामुळें पाण्यांतील गाळ येथें तळाशीं बसतो. असा गाळ पुष्कळ सांचला म्हणजे पाण्याची खोली कमी होते. म्हणून येथील गाळ काढण्याचें काम नित्य करावें लागतें.

आतां आपण **राणीगंज** येथील **कोळशाची खाण** पाहावयास जाऊं. ह्या पाहा कोळशाच्या खाणी. येथें जी मालाची गाडी उभी

दिसते ती सर्व दगडी कोळशानें भरली आहे. अशा अनेक गाड्या रोज येथून भरून जातात. आसपासच्या प्रदेशांत अशा कोळशाच्या खाणी पुष्कळ आहेत.

कोळशाच्या खाणी जमिनीच्या खालीं बऱ्याच खोल असतात. त्यांत उतरण्यासाठीं, मोठ्या रहाटाच्या साहाय्यानें खालींवर जाणाऱ्या




दगडी कोळशाची खाण व तिजवरील रहाट.

एका पिंजऱ्यासारख्या खोलींत बसावें लागतें. रहाटानें घागर विहिरींत सोडतात त्याप्रमाणें वाफेनें चालणाऱ्या यंत्रानें हा पिंजरा खालीं खाणींत सोडतात व घागरीप्रमाणेंच वर ओढतात. ह्या पिंजऱ्यांत बसून खाणींत उतरतांना अंधारांतून पाताळांत जात असल्याचा अनुभव येतो व नवीन माणसास भीति वाटते. खालीं उतरल्यावर अंधारांतून जमिनीच्या पोटांतून कोळसा खणून काढण्यासाठीं केलेले लांबच्या लांब बोगदे, या अंधारी बोगद्यांत दिव्याच्या उजेडांत चाल-

लेलें कोळसा खणण्याचें काम, बोगद्यांतील रुळांवरून गाड्या ओढण्यासाठीं ठेवलेल्या घोड्यांचे बोगद्यांतले तबेले ह्या गोष्टी पाहून फार मौज वाटते.

बंगालमधून आपण आसाम प्रांतांत जाऊं. हिमालयाचें पूर्व टोंक व ह्या ब्रह्मदेशांतील दक्षिणोत्तर पर्वत मिळून जो कोपरा झाला आहे त्यांत हा देश आहे. यांतून ब्रह्मपुत्रा नांवाची मोठी नदी वाहात गेली आहे. या देशांतील कांहीं भागांत पाऊस फारच भयंकर पडतो; इतका कीं, तेवढा पाऊस जगांत कोठेंही पडत नाहीं. पावसाची केवळ मुसळधार चालते. छत्री घेऊन जरी मनुष्य पावसांत घटकाभर हिंडला तरी तो भिजून चिंब व्हावयाचा. पुण्यास किंवा नाशकास जेवढा पाऊस सबंध पावसाळ्यांत पडतो, तितका येथें पावसाळ्यांत दोन दिवसांत व कधीं कधीं एकाच दिवसांत पडतो. सिंध, पंजाब, राजपुताना वगैरे देशांत 'देवा, पाऊस दे' म्हणून प्रार्थना करावी लागते, तर या देशाच्या कांहीं भागांतील लोकांना 'देवा, पाऊस पुरे कर' अशी प्रार्थना करावी लागते. येथील पावसाची तुलना निरनिराळ्या ठिकाणच्या पावसाशीं केली आहे, ती शेवटीं आकृतींत पाहा.

आसामांतील हे चहाचे मळे पाहा. असे लाखों मळे या देशांत आहेत. ह्या मळ्यांतून सुमारें तीस कोट किमतीचा चहा तयार होतो जंगलांतील हा 'गेंडा' नांवाचा प्राणी पाहा.


गेंडा.

या देशाच्या उत्तरेस व पूर्वेस डोंगर किती आहेत ? पूर्वेकडील

डोंगरास **आराकानचे डोंगर** म्हणतात. त्याच्या पलीकडे ब्रह्मदेश नांवाचा देश आहे. या पूर्वेकडील डोंगराळ प्रदेशांतून एकदां इंग्लिश सरकारनें ब्रह्मदेशांत सैन्य पाठविण्याचा प्रयत्न केला, पण जंगलांतील बिकट वाट व रोगट हवेमुळें सैन्यांत होणारी मृत्यूची भयंकर संख्या या अडचणींमुळें सैन्यास परत यावें लागलें.

आसामची राजधानी **शिलांग** हें शहर होय. येथून आपण बंगालमध्यें जाऊं व तेथून बंगाल नागपूर रेल्वेनें पश्चिमेकडे जाऊं. वाटेनें हें जंगल किती आहे तें पाहा. यांत प्रचंड वाघ आहेत. हा



बंगालमधील वाघ.

पाहा बंगालमधील वाघ. वाटेनें आपणांस बहार—ओरिसा प्रांतांतील छोटानागपूर प्रांताचा प्रदेश लागतो. या प्रांतांतील बंगाल नागपूर रेल्वेच्या ‘ कालिमती ’ स्टेशनावर आपण उतरूं. येथून ३।४ मैलांवर टाटा कंपनीचा **साक्ची** गांवाजवळ लोखंडाचा प्रसिद्ध कारखाना आहे. युरोपियन पद्धतीनें फार मोठ्या प्रमाणावर पोलाद तयार करण्याचा हा हिंदुस्तानांतील पहिला कारखाना होय. साक्चीच्या आसपास लोखंडाची माती, दगडी कोळसा व चुनखडी हीं सांपडतात. लोखंड तयार करण्यास दगडी कोळसा व चुनखडी

यांची मदत लागते, म्हणून लोखंडाचे कारखान्यास ही जागा फार सोईची आहे. या कारखान्यांत दरवर्षी कित्येक कोटींचें लोखंड तयार होतें.

येथें कारखान्यामुळें जें शहर वसले आहे, त्यास ' **जमशेटपूर** ' असें नांव ठेविलें आहे. टाटा कंपनी व हा कारखाना काढणारे मूळ पार्शी गृहस्थ जमशेटजी नसरवानजी टाटा यांचें स्मरण राहावें म्हणून यास जमशेटपूर असें नांव दिलें आहे.

आसपासच्या प्रदेशांतील कोळशाच्या खाणी पाहा. छोटानागपूर प्रांतांतील मूळचे रानटी लोक [ कोंढ. संताळ ] पाहा.

या पुढें रेल्वेस बराच चढ आहे असें आढळून येतें. यावरून पुढील प्रदेशाच्या उंचीसंबंधानें काय अनुमान निघतें ? येथें कोणत्या पर्वतांचीं टोंकें आलेलीं दिसतात ?



संताळ स्त्री.

या बंगाल—नागपूर रेल्वेनें आपण मध्यप्रांतांत जाऊं. या देशांत **नर्मदा, तापी** व **महानदी** या तीन मोठ्या नद्या असून त्यांचे उगमही याच देशांत आहेत.

महानदीस फार मोठे पूर येतात. मागें एकदां मोठा पूर आला होता त्यावेळीं ४-४। लाख लोकांना घरें सोडावीं लागलीं. नावा, होड्या, कळकांचे ताफे व झाडांचे ओंडके यांच्या आश्रयानें हजारों कुटुंबें पाण्यावर तरंगत होतीं. कांहीं माणसें मोठमोठ्या झाडांवर माकडांप्रमाणें जाऊन बसलीं होतीं. देवळाचे पुजारी तर पुरापासून जीव बचावण्यासाठीं शिखराचा आश्रय करून राहिले होते.

भयंकर जलप्रलयाच्या संकटामुळें सर्व प्राणी इतके दीन होऊन गेले होते कीं, एका कवितेंत कालिदास कवीनें प्रखर ग्रीष्मऋतूच्या ( उन्हाळ्याच्या ) वर्णनांत सांगितल्याप्रमाणें सर्पासारखे भयंकर प्राणी देखील आपला स्वाभाविक द्वेष विसरून माणसें असलेल्या जागीं आश्रयाकरितां आले होते! या प्रलयांत जनावरें किती मेलीं त्याची तर गणतीच नाहीं.

या प्रांतांतील या कोळशाच्या खाणी पाहा. आतां आपण या प्रांताची राजधानी जें **नागपूर** शहर तेथें जाऊं. येथील ही प्रचंड गिरणी पाहा. हींत दरवर्षी कोट्यवधि रुपयांचें कापड तयार होतें. येथें कापसाचा व्यापार फार चालतो. नागपुरास व आसपास रेशीमकांठी उपरणीं व लुगडीं पुष्कळ तयार होतात. आपल्याइकडेही नागपुरी धोतरें व लुगडीं प्रसिद्ध आहेत. या प्रांताच्या बऱ्याच भागांत मुख्य अन्न गव्हाची भाकर होय. नागपुराहून आपण हिंगणघाटाला जाऊं. **हिंगणघाट** येथें हा कापसाचा बाजार केवढा मोठा आहे तो पाहा. कापसाच्या हंगामांत येथें दररोज हजारावर गाड्या येतात. प्रत्येक गाडींत सुमारें दोनशें रुपयांचा कापूस असतो. अर्थात् येथें रोज लाखों रुपयांच्या कापसाची विक्री होते. मध्यप्रांताच्या बऱ्याच भागांत, विशेषतः वऱ्हाड प्रांतांत, शेतकऱ्यांना विशेष फायद्याचें पीक कापसाचें होय. कापसाचें शेत ही सोन्याची खाण आहे असें म्हटलें तरी चालेल. एक वर्षी कापूस चांगला पिकला तर शेतकऱ्यास इतके पैसे मिळतात कीं, पुढें एक दोन वर्षें शेत चांगलें पिकलें नाहीं तरी त्याची त्यास फारशी पर्वा वाटत नाहीं. कापूस चांगला पिकतो त्या वर्षी पुष्कळ पैसे मिळतात. यामुळें पुष्कळ शेतकरी आपले पैसे जुगारींत व दुसऱ्या व्यसनांत घालवितात. वऱ्हाड प्रांतांतून दरवर्षी सुमारें तीस कोटींचा कापूस बाहेर जातो. कापसाच्या पिकामुळें वऱ्हाड प्रांत

फार सधन झाला आहे. वऱ्हाडांतल्याइतके सधन शेतकरी मुंबई इलाख्यांत नाहींत. सरकारास हजारावर सारा भरणारे शेतकरी वऱ्हाडांत अनेक आहेत. या भागांत उन्हाळा फारच असतो. उन्हाळ्यांत भिंती इतक्या तापतात कीं, भिंतींतील पिसा, ढेकूण सर्व मरून जातात. त्या दिवसांत घरांत ढेकूण औषधासही मिळणें कठीण ! उन्हाळ्यांत मडक्यांतील थंडगार पाणी वारंवार प्यावें लागतें व तेथील हवा उष्ण व कोरडी असल्यामुळें उन्हाळ्यांत पाणी कितीही प्यालें तरी तें बाधत नाहीं; एवढेंच नव्हे, तर उन्हाळ्यांत पुष्कळ पाणी पिणें येथें जरूरच आहे. तान्ह्या मुलांसही येथें उन्हाळ्यांत थोडें पाणी पाजावें लागतें.

येथें हिंवाळ्यांत थंडी बरीच असते, पण ती पंजाबइतकी नसते. येथील मजुराचा हिंवाळ्यांतील पोशाक पाहा. त्यानें आपलें सर्व अंग कपड्यानें आच्छादिलें आहे.

जवळच्या **वर्ध्याच्या कोळशाच्या खाणी** पाहून आपण मद्रास इलाख्यांत जाऊं. वाटेनें आपणांस प्रथम **गोदावरी** व नंतर **कृष्णा** ह्या नद्या लागतात. पुढें **पेन्नार** नदी ओलांडून आपण मद्रास शहरास जाऊं. **मद्रास** हें या इलाख्यांतील मुख्य बंदर असून मद्रास इलाख्याची राजधानी आहे. लोकसंख्येच्या मानानें हें हिंदुस्तानांत ३ ऱ्या नंबरचें शहर आहे. हिंदुस्तानच्या पूर्वेकडील किनाऱ्यास **कारोमांडेल** किनारा म्हणतात. हे पाहा एक मद्रासी गृहस्थ. हल्लीं नोव्हेंबर महिना आहे पण येथें पावसाळ्याप्रमाणें पाऊस पडत आहे. येथें डिसेंबर व जानेवारी या महिन्यांतही पाऊस पडतो. कोंकणांत व देशाच्या बऱ्याच भागांत जून—जुलैमध्यें पाऊस खूप पडतो, तेव्हां येथें पाऊस फार पडत नाहीं. याचें कारण काय असावें बरें ? येथें आपण खाणावळींत जेवण करून साउथ इंडियन रेल्वेनें रामेश्वर या क्षेत्रास जाऊं. मद्रास येथें मुख्य अन्न भात. पहिल्यानदां, दुसऱ्यानदां,

**पुणें व मद्रास येथील पावसाची तुलना.**

| महिना. | पुणें. | मद्रास. |
|---|---|---|
| | इंच. | इंच. |
| मे | १॥ | २ |
| जून | ५॥ | २ |
| जुलई | ६॥ | ४ |
| ऑगष्ट | ४ | ४॥ |
| सप्टेंबर | ४॥ | ४॥ |
| आक्टोबर | ४ | ११ |
| नोव्हेंबर | १ | १०३॥ |
| डिसेंबर | २ | ५ |

तिसऱ्यानदां फक्त भात. भाकरी मुळींच नाहीं. भातावर ताक किंवा चिंचेचें सार. इकडील जेवणाचें वर्णन पुढीलप्रमाणें एका गृहस्थांनीं केलें आहे.

"भातांत घासागणिक खडा लागे. 'बायका तांदूळ निवडत नाहींत का' म्हणून विचारतां यजमान सांगतात 'तांदूळ थोडे लागतील तर निवडावयाचे. इतके थोरले तांदूळ रोज लागणार त्याना निवडावयाला कोण रिकामें आहे?'

"जेवतांना मनगटापर्यंत हात बरबटले पाहिजेत अशी इकडील जेवणाची वहिवाट आहे. लोक घासही फार मोठा घेतात. कांहीं लोक भाताचा गोळा करून तो तोंडात सोडतात."

येथील लोकांचें अन्न कमी पौष्टिक असतें. पंजाब, संयुक्तप्रांत वगैरे देशांतील लोकांप्रमाणें येथील लोकांना गव्हाची भाकर, तूप, दूध वगैरे पदार्थ फारसे मिळत नाहींत. शेतकरी व गरीब लोक नाचणीची भाकरी खातात. ही भाकरी ज्वारी अगर बाजरीच्या भाकरीपेक्षां गोडीला कमी असते.

इकडील लोकांची राहाणी फार साधी आहे. घरांत चैनीचे व

डामडौलाचे पदार्थ फारसे दृष्टीस पडत नाहींत. घर सारवून नेहमीं स्वच्छ ठेवलेलें असतें. शेंपन्नास रुपये पगार मिळविणाऱ्या माणसालाही आपलें घर सारवणें कमीपणाचें वाटत नाहीं. इकडे धुराळा कमी याचें कारण काय असावें ? यावरून हवा दमट असावी कीं कोरडी असावी याबद्दल काय अनुमान निघतें ? जमीन दमट किंवा ओलसर असेल तर धुराळा होईल, कीं ती कोरडी असेल तर ? जमीन ओलसर असल्यास हवा कशी असली पाहिजे ? पंजाबांत अशी हवा कां नाहीं ?

वाटेनें कोणकोणत्या नद्या लागतात पाहा. प्रथम **पालर**, नंतर दक्षिण **पेन्नार** व नंतर **कावेरी**.

हें **रामेश्वराचें देवालय** पाहा. येथें यात्रेकरू किती आले आहेत ? ह्यांपैकीं पुष्कळ काशीहून बरोबर गंगा ( गंगेचें पाणी ) घेऊन रामेश्वरास वाहण्याकरितां येथें आले आहेत.

येथील लोकांचा वर्ण म्हणजे शरिराचा रंग पाहा. येथें बहुतेक लोक काळे आहेत. यांचे आंगावर कपडे किती कमी आहेत! सद्रा व कोट अंगांत क्वचितच दृष्टीस पडतो. कारण, येथील हवेंत थंडपणा बहुतेक नाहींच. येथें शाळांतून व सरकारी कचेऱ्यांतून, मुलें व लोक कपड्यावांचून जातात.

आपल्या इकडील एक गृहस्थ रामेश्वरच्या यात्रेला गेले होते. त्यांना आगगाडींत एका तिकडील माणसानें आपलें ‘ पैशाचें पाकीट ठेवा ’ म्हणून सांगितलें. कारण विचारतां तो म्हणाला, ‘ तुमच्या-सारखा माझ्या अंगांत कपडा नाहीं म्हणून मला पाकीट खिशांत ठेवतां येत नाहीं.’ यावरून तिकडे कपडे किती कमी वापरण्याची चाल आहे हें दिसून येईल. येथें हिंवाळ्यांत देखील अंगावर कपडा नसला तरी चालतो. कारण त्या दिवसांत थंडी फार थोडी असते. एथें हिंवाळा ऋतु नसतो असें म्हटलें तरी चालेल. उन्हाळ्यांत तर

सर्व रात्रींत अंगावर पांघरूण घेण्याचें कारण पडत नाहीं. येथील हवेची उन्हाळ्यांतील उष्णता व हिंवाळ्यांतील उष्णता ह्यांत फार फरक नाहीं. तसेंच दोनप्रहरची उष्णता व सकाळची उष्णता यांत फार फरक नाहीं. अर्थात् ही हवा २४ तास व बारा महिने बहुतेक सारखी असते. अशा प्रकारच्या म्हणजे जिच्यांत फरक कमी पडतो अशा हवेस सम हवा म्हणतात. सम म्हणजे सारखी. ही हवा सम असण्याचें कारण काय असावें? रामेश्वराजवळ बंगालचा उपसागर व अरबी समुद्र मिळालेले आहेत. या दोन समुद्रांना सांधणारा जो पाण्याचा भाग आहे त्यास पाल्कची सामुद्रधुनी म्हणतात. येथें बंगालच्या उपसागरास 'महोदधि' म्हणजे मोठा समुद्र असें म्हणतात, व अरबी समुद्रांत ( म्हणजे मानारचें आखात म्हणून जो अरबी समुद्राचा भाग आहे त्यांत ) रत्नें—मोतीं—सांपडतात यावरून त्यास रत्नाकर (रत्नांचा आकर म्हणजे खाण अशा अर्थाचें ) असें नांव दिलें आहे.

रामेश्वरापासून दक्षिणेकडे सिलोन बेटापर्यंत समुद्रांत हे खडक दिसतात, त्यास रामाचा सेतु म्हणतात. या संबंधाची कथा तुम्हांस माहीत असेलच.

रामेश्वराचे नैर्ऋत्येस हिंदुस्तानचें अगदीं दक्षिणेकडील टोंक दिसतें, तें कामोरिन भूशिर होय. येथें अरबी समुद्राचा अरुंद भाग हिंदुस्तान व सिलोन यांमध्यें आहे, त्यास मानारचें आखात म्हणतात. त्यांत बुड्या मारून तळाचे मोत्यांचे शिंपले काढणारा हा पाणबुड्या पाहा. या आखातांत एकाद्या वर्षीं लाख रुपयांचीं मोतीं सांपडतात.

येथून आगबोटींत बसून मद्रास इलाख्याचे किनाऱ्या किनाऱ्यानें जाऊं. हिंदुस्तानच्या पश्चिमेकडील ह्या सर्व किनाऱ्यास **मलबार किनारा** म्हणतात. हें पहा मलबार किनाऱ्यावरील **कोचीन** बंदर. येथून ही आगबोट चालली आहे ती पाहा. हींत सागवान किती भरलें आहे?

2894

जवळ मलबार म्हणून जो देश आहे त्यांत हें सागवान होतें. आपल्या इकडे सरकारी इमारतींना व इतर चांगल्या इमारतींना जें लाकूड वापरतात तें हें मलबारी सागवान होय. तसेंच टेबलें, खुर्च्या, कपाटें वगैरे ज्या तपकिरी लाकडाच्या करतात तेंही मलबारी सागवान होय.


कोचीन जवळचा हा काथ्याच्या दोऱ्या वळण्याचा कारखाना पाहा. नारळावर जे तंतु असतात त्यांस काथ्या म्हणतात. दोऱ्या वळणाऱ्या लोकांच्या आंगावर कपडे किती कमी आहेत? यावरून येथील हवेविषयीं काय समजतें? ह्या भागांत हा काथ्याच्या दोऱ्या करण्याचा धंदा फार चालतो. यावरून या भागांत होणाऱ्या नारळांचे उत्पन्नासंबंधानें काय समजून येतें? येथें नारळाचें उत्पन्न फार होतें. या देशांत चोहोंकडे नारळाच्या व सुपारीच्या झाडांची गर्दी दिसते. लोकांच्या झोंपड्या कशाच्या केलेल्या आहेत पाहा. या झोंपड्या करण्यांत नारळाच्या झाडाच्या निरनिराळ्या भागांचा उपयोग केला आहे. यावरून नारळाचें झाड किती उपयोगी आहे पाहा.

या कोचीन बंदरांतून खोबऱ्याचें तेल व काथ्या हीं पुष्कळ रवाना होतात.

जवळचा **मलबार** देश पाहा. या देशाचे पूर्वेकडील सह्याद्रि नांवाची पर्वताची रांग व सह्याद्रीवरील सागवानाचे जंगल पाहा. हीं सागाचीं झाडें केवढी मोठीं, किती सरळ व उंच गेलीं आहेत? हा सागाच्या लाकडाचा ढीग पाहा. मलबार देशांत चोहोंकडे हिरवेंगार दिसतें; जिकडे तिकडे शेतें, बागा व जंगल आहे.

ह्या **कोइमतूर** शहरीं जरीच्या कापडाचे कारखाने अतिशय आहेत. येथें लाखों रुपयांचें जरीचें कापड व जरीचीं पातळें तयार होतात.

हें मंगळूर किंवा मंगलोर बंदर पाहा. आपल्या इकडे घरांवर मंगलोरी म्हणून जीं तांबडीं कौलें घालतात तीं तयार करण्याचे कार-



काश्मीरच्या शाली विणणें.

खाने या **मंगलोर** शहरीं आहेत. येथें व मद्रास इलाख्यांत इतर ठिकाणीं चेक नांवाचें कापड बरेंच तयार होतें. मद्रासकडील कापड बळकट म्हणून प्रसिद्ध असतें. याचें कारण या कापडाचें सूत चांगलें पीळदार असतें हें असावें. या देशाच्या हवेंत सुतास जास्त पीळ खपतो म्हणजे पुष्कळ पीळ दिला तरी सूत तुटत नाहीं. याचें कारण काय ? याचा येथील हवेशीं कांहीं संबंध असावा काय ? 'होय.' दमट हवेंत सुतास पुष्कळ पीळ खपतो.



तोडा स्त्री.

निलगिरि पर्वताच्या आसपास राहाणारे हे तोडा जातीचे लोक पहा. त्यांच्या झोंपड्या किती चमत्कारिक आहेत !

निलगिरीच्या आसपास चहाचे व कॉफीचे मळे किती आहेत !

आतां आपण मद्रास इलाख्यांतील **म्हैसूर** हें संस्थान पाहूं. मद्रासेकडून मद्रास व सदर्न मराठा रेल्वेनें प्रथम आपण को-




तोडा लोकांची झोपडी.

लार येथें जाऊं. या पाहा **कोलार येथील सोन्याच्या खाणी.** ह्या खाणींतील यंत्रें चालविण्यास विजेचा उपयोग करतात. ही वीज येथून शेंपन्नास मैलांवर असलेल्या **शिवसमुद्र** नांवाच्या कावेरी नदीच्या धवधब्याच्या पाण्याच्या शक्तीनें तयार करून येथें तारांतून आणली आहे. या खाणींतून दरवर्षी २।३ कोट रुपयांचें सोनें निघतें.

विजेच्या शक्तीच्या पुरवठा करण्यासाठीं म्हैसूर संस्थानांत **कन्नंबाडी** येथें कावेरीस धरण बांधून मोठा तलाव केला आहे तोही पाहाण्यासारखा आहे. एवढा मोठा तलाव हिंदुस्तानांत दुसरा नाहीं. या तळावाचें सर्व काम हिंदी एंजिनियरांनीं केलें आहे, ही लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे.

म्हैसूर संस्थानांतील **बंगलोर** येथील चंदनाच्या तेलाचा हा कारखाना पाहा. यापासून म्हैसूर संस्थानास दरवर्षी सुमारें २० लाख रुपये नफा होतो.



हत्तींचा कोंडवाडा.

म्हैसूरच्या जंगलांतील हा हत्तींचा कोंडवाडा पाहा. यास इकडे खड्डा म्हणतात. ज्यांत हत्ती आहेत, अशा जंगलांत सागवानी खोट जमिनींत रोवून एक मोठें आवार करतात, व त्यांत जाण्यास फक्त एकच वाट मोकळी ठेवतात. ही मोकळी वाट पाहिजे तेव्हां बंद करण्याची व्यवस्था केलेली असते. नंतर जवळच्या जंगलांत हिंडून त्यांत गोंगाट करून त्यांतील हत्तींना बुजवून व अडवून ते खड्ड्याकडे जातील असें करतात. खड्ड्यांत आपणास लपण्यास जागा मिळेल अशा समजुतीनें हत्ती त्यांत शिरतात. ते शिरले म्हणजे लपून बसलेले लोक त्यांची वाट बंद करून टाकतात. कधीं कधीं जंगली हत्तींना फूस लावून खड्ड्यांत आणून सोडण्याकरितां मुद्दाम शिकविलेले हत्ती जंगलांत सोडतात व ते हत्ती नवीन हत्तींना या खड्ड्यांत आणून सोडतात. खड्ड्यांत हत्ती आले म्हणजे दोरीचा फांस पायांत अडकवून किंवा पायांत खोडा घालून हत्तीला धरतात.

म्हैसूरच्या पूर्वेकडील **शिवराय** टेकड्यांच्या उतरणीवरील व **निलगिरीच्या** उतरणीवरील हे चहाचे मळे पाहा. या सर्व मळ्यांत दर वर्षी २॥ कोट रुपये किंमतीचा चहा होतो.


सह्याद्रीच्या पूर्व उतरणीवरील हे कॉफीचे मळे पाहा.

आतां आपण मद्रास व सदर्न मराठा रेल्वेनें परत मुंबई इलाख्यांत येऊं. ही तुंगभद्रा नदी ओलांडली म्हणजे आपण मुंबई इलाख्यांत आलों व येथें आपला हिंदुस्तानांतील प्रवास संपला.

---

# एकीकरण व अवांतर माहिती.

**हिंदुस्तानचें पृथ्वींत स्थान व सीमा**—हा पृथ्वीचा गोल पाहा. ह्याचा कांहीं भाग समुद्र आहे व कांहीं भाग जमीन आहे. या जमिनीचे मोठमोठे निरनिराळे भाग आहेत त्यांस खंडें म्हणतात.




खंड म्हणजे तुकडा. पृथ्वीवरील जमिनीचे हे मोठमोठे विभाग किंवा तुकडे आहेत, म्हणून त्यांस खंडें असें म्हणतात. अशीं खंडें युरोप, आशिया, अमेरिका, आफ्रिका, व ऑस्ट्रेलिया हीं होत (नकाशा पाहा). या खंडांपैकीं आशिया खंडांत आपला हिंदुस्तान देश आहे. आशियाचे दक्षिणेस अरबस्तान, हिंदुस्तान व इंडोचायना हीं द्वीपकल्पें आहेत. यापैकीं मधलें द्वीपकल्प हिंदुस्तान होय.

अक्षांश रेखांश (जरूर असल्यास) नकाशांत पाहा.


**सीमा**—नकाशांत हिंदुस्तान देश कोठपर्यंत पसरला आहे,


अर्थात् त्याचे कडेला कोणकोणते प्रदेश आहेत हे पहा; म्हणजेच हिंदुस्तानच्या सीमा पाहा. उत्तरेपासून आरंभ करून उजवीकडून प्रदक्षिणा करतांना ज्या क्रमानें सीमा लागतात त्या क्रमानें सांगा. सीमा सांगतांना हद्दीवर एकादा पर्वत किंवा नदी असल्यास ती प्रथम सांगून नंतर पलीकडचा देश सांगा.

नकाशाकडे पाठ करून किंवा नकाशा झांकून तो मनामध्यें आणून सीमा सांगा. आपल्या देशाशेजारीं कोणते देश आहेत हें समजावें यास्तव सीमा पाहावयाच्या. त्या पाठ करण्याचें कारण नाहीं.

हिंदुस्तानच्या सीमांचें थोडक्यांत वर्णन करावयाचें म्हटलें, म्हणजे हिंदुस्तानच्या एका अंगास अतिशय उंच व अवघड अशा पर्वतांचा व दुसऱ्या अंगास समुद्राचा वेढा आहे. हिंदुस्तानच्या सीमा अशा प्रकारच्या असल्यामुळें कोणत्याही परराष्ट्रास हिंदुस्ताना-वर सहज स्वारी करणें शक्य नाहीं. कारण एकीकडे पर्वतांचा दुर्भेद्य तट आहे व दुसरीकडे हिंदीमहासागररूपी प्रचंड खंदक आहे.

◦ **लांबीरुंदी**—पुढील आकृतीवरून हिंदुस्तानची पूर्व पश्चिम लांबी किती असल्याचें समजतें? दक्षिणोत्तर लांबी किती?

**क्षेत्रफळ**--  ह्याप्रमाणें चोहों बाजूंनीं एकेक मैल प्रदेश असला म्हणजे त्यास एक चौरस मैल म्हणतात. आपल्या गांवचा [अमुक] भाग अथवा शेजारचा....प्रदेश सुमारें एक चौरस मैल आहे तो तुम्हीं पाहिला आहे. आकृतींतील एक चौरस दहा हजार चौरस मैल अथवा सुमारें दोन जिल्ह्यांचें क्षेत्र दाखवितो. असे चौरस हिंदुस्तान-च्या नकाशांत किती आहेत? जे चौरस अपुरे आहेत अशांपैकीं लहान दोन चौरसांबरोबर एक पूर्ण व बहुतेक पुऱ्या चौरसाबरोबर पाऊण चौरस धरा. पुरे चौरस किती होतात? यावरून हिंदुस्तानचें क्षेत्रफळ किती असल्याचें समजून येतें?






हिंदुस्तान, क्षेत्रफळांची तुलना. इलाखा, जिल्हा.

हिंदुस्तान मुंबई इलाख्याच्या आठपट मोठें आहे.

मुंबई इलाख्यांतील मध्यम प्रतीचा जिल्हा ( उदाहरणार्थ सातारा किंवा पुणें ) घेतला तर त्याच्या सुमारें तीनशेंपट हिंदुस्तान मोठें आहे. ( आकृति पाहा.)

संस्थानें धरून हिंदुस्तानचें क्षेत्रफळ सुमारें १४॥ लक्ष चौरस मैल आहे. [आकृति पाहा.] **लोकसंख्या**—लोकसंख्या सुमारें ३० कोट आहे.

**आखातें, बेटें इ०**—किनाऱ्या किनाऱ्यानें हिंदुस्तानाभोंवतीं फिरलें असतां लागणारीं आखातें, भूशिरें व बेटें पाहा. 'लखदीव' याचा अर्थ लाख बेटें असा होतो. हा 'लक्षद्वीप' याचा अपभ्रंश असावा. 'मालदीव' याचा अर्थ हजार बेटें असा आहे.

या बेटांतून पुष्कळ कवड्या व शिंपले परदेशीं जातात.

कारोमांडेल किनाऱ्याचे पूर्वेस बऱ्याच अंतरावर बंगालच्या उपसागरांत **अंदमान** व **निकोबार** हीं बेटें आहेत. काळ्या पाण्याची शिक्षा झालेले कैदी अंदमान बेटांत १९२१ सालापूर्वीं पाठवीत असत.

(हिंदुस्तानांतील लोकांस हिंदुस्तानाबाहेर कैदेंत ठेवण्याची जी शिक्षा देतात तीस काळ्या पाण्याची शिक्षा म्हणतात.)


## हिंदुस्तानांतील उंच प्रदेश व सखल प्रदेश—

◦ रस्त्यानें लागणारा चढ उतार या संबंधानें जी माहिती दिली आहे तिच्यावरून कोणता प्रदेश उंचवट्याचा असल्याचें दिसून येतें? हिंदुस्तानच्या आराखड्यांत उंचवट्याचे प्रदेश दाखवा. नकाशांत दाखविलेल्या गांवांपैकीं कोणतीं उंचवट्याच्या प्रदेशांत व कोणतीं सखल प्रदेशांत आहेत हें सांगा.

पुढील गांवें उंचवट्याच्या प्रदेशांत आहेत कीं सखल प्रदेशांत आहेत, हें नकाशा पाहून सांगा.

दिल्ली, जगन्नाथपुरी, मद्रास, पुणें, सोलापूर, मुंबई, सुरत, काशी, नागपूर....इ०


विंध्यपर्वताचे उत्तरेकडील भागास नुसतें हिंदुस्तान किंवा उत्तर हिंदुस्तान व दक्षिणेकडील भागास दख्खन म्हणण्याची वहिवाट आहे.




**पर्वत**—नकाशांत हिंदुस्तानांतील निरनिराळे पर्वत पाहा.


**हिमालय**—सर्व हिंदुस्तानांत अतिशय उंच भाग हिमालय पर्वत होय. तो हिंदुस्तानांतच अतिशय उंच आहे असें नाहीं, तर सर्व जगांत अतिशय उंच आहे. सह्याद्रीसारखे १० पर्वत एकावर एक उचलून ठेवावे तेव्हां त्यांची उंची हिमालयाच्या इतकी होईल.

हिम=बर्फ; आलय=स्थान, घर; हिमालयाच्या उंच भागावर नेहमीं बर्फ असतें व या पर्वताच्या उंच दऱ्यांमध्यें बर्फाच्या नद्या आहेत, म्हणून या पर्वतास हिमालय म्हणजे बर्फाचें घर म्हणतात. आपणांकडे पाठ करून ठेवलेल्या धनुष्याप्रमाणें या पर्वताचा आकार आहे. लांबी सुमारें १॥ हजार मैल व रुंदी सरासरीनें १०० मैल आहे.




हिंदुस्थानांतील निरनिराळ्या पर्वतांची उंची-संबंधानें तुलना.

पर्वतांच्या अनेक समांतर रांगा मिळून हिमालय झाला आहे. या रांगांपैकीं **दोन रांगा विशेष उंच** व लांब असल्यामुळें महत्त्वाच्या आहेत. त्यांपैकीं **दक्षिणेकडील रांग अधिक उंच** आहे. हिमालयाचीं अतिशय उंच शिखरें याच रांगेंत आहेत.




लांबीसंबंधानें पर्वतांची तुलना.

हिमालयाची सरासरी उंची २०,००० फूट आहे. हिमालयास अनेक उंच शिखरें आहेत. त्यांपैकीं ७० शिखरें २४ हजार फुटां-

हून जास्त उंचीचीं आहेत. त्या सर्वांत **एव्हरेस्ट** हें शिखर अत्युच्च होय. त्याची उंची २९ हजार फूट आहे. **कांचनगंगा, धवलगिरि, गौरीशंकर, नंदादेवी** व **नंगापर्वत** हीं हिमालयाचीं इतर मोठीं शिखरें होत. हिमालयावर १६ ते १८ हजार फुटांवर नेहमीं बर्फ असतें.

**हिमालयाचें महत्त्व**—(१) हिंदुस्तानांतील निम्या नद्यांचे उगम हिमालय पर्वतांत आहेत. (२) नैर्ऋत्येकडील मान्सून वाऱ्यांबरोबर येणारे ढग हिमालयामुळें अडविले जाऊन त्यांचें पाणी हिमालयाचे दक्षिणेकडील प्रदेशास मिळतें. (३) हिमालयांतून वाहात येणाऱ्या नद्यांमुळें हिमालयाची जी झीज होते तिजपासून उत्पन्न होणारा गाळ सांचून उत्तर हिंदुस्तानास सुपीकपणा आलेला आहे. (४) हिमालयामुळें उत्तरेकडील थंड वाऱ्यांपासून हिंदुस्तानचें थोडेंसें रक्षण होतें.

आकृति पाहून पुढील प्रश्नांचीं उत्तरें द्या. सर्वांत उंच पर्वत कोणता? त्याच्या खालोखाल उंच कोणता? सर्वांत लांब पर्वत कोणता? त्याच्या खालोखाल लांब कोणता?

**नद्या**—ह्या हिंदुस्तानच्या नकाशांत ही सिंधु नदी पाहा. तिचा उगम कोठें आहे? ती प्रथम कोणत्या दिशेनें वाहाते? कोणकोणत्या देशांतून वाहते? कोणास मिळते? ती एका मुखानें मिळते कीं अनेक मुखांनीं मिळते? मुखाजवळ जमिनीचा भाग समुद्रांत घुसल्यासारखा दिसतो काय? ही जमीन कशानें बनली असावी? नदीबरोबर येणारा गाळ सांचून ती झाली आहे. याप्रमाणें इतर नद्यांबद्दल माहिती मिळवा.

सिंधूचे पात्र वारंवार बदलतें. यावरून सिंधु नदी हिंदुस्तानच्या ज्या भागांतून वाहाते तो सपाट किंवा उंचसखल अगर खडकाळ असावा याविषयीं काय अनुमान निघतें?

सपाट असेल तर प्रवाह बदलेल, कीं खडकाळ असेल तर बदलेल? 'सपाट;' कारण, नदीच्या दोन्ही बाजूंस खडक असतील तर तिचें पात्र फार करून बदलणार नाहीं.

**हवामान**—आकृतींत निरनिराळ्या ठिकाणच्या हवेचें कमींत कमी (हिंवाळ्यांतील सकाळचें) उष्णमान व जास्तींत जास्त ( उन्हाळयांतील दोनप्रहरचें ) उष्णमान यांचे आंकडे दिले आहेत ते पाहा.

आकृतीवरून जों जों उत्तरेकडे जावें तों तों उष्णमानांत काय फरक पडत जातो ? सखल प्रदेश व उंचवट्याचा प्रदेश यांतील उष्णमानांत काय फरक दिसून येतो ? यावरून काय अनुमान निघतें ?

आकृतीवरून समुद्रापासून जों जों दूर जावें तों तों वर्षांतील कमींत कमी उष्णमान व जास्तीत जास्त उष्णमान यांत काय फरक पडत असल्याचें दिसून येतें ?

हा फरक सर्वांत जास्त कोणत्या भागांत आहे ? हा भाग समुद्रापासून दूर आहे कीं समुद्रास जवळ आहे ? फरक कमी कोठें आहे ? हा भाग समुद्राजवळ कीं समुद्रापासून दूर ? समुद्राजवळ.

**पाऊस**—ढग ही पाण्याची वाफ होय असें म्हणतात. पण खरोखरी ढगांमध्यें धुळीच्या सूक्ष्म ( म्हणजे बारीक ) कणांवर सांचलेले पाण्याचे अतिशय बारीक कण ( अथवा सूक्ष्म जलबिंदु ) असतात. पाण्याची खरी वाफ डोळ्यांस दिसत नाहीं; ती हवेसारखी अदृश्य असते. आधणाचे भांड्यांतून निघणारी वाफ देखील खरी वाफ नसून ते, हवेंतील थंडी लागल्यामुळें वाफ घट्ट बनून तिच्यापासून बनलेले पाण्याचे असंख्य बारीक थेंब असतात.

ढग सूक्ष्म जलबिंदूंचे बनलेले असतात म्हणून पाऊस पडण्याचें मुख्य कारण ढगांस थंड हवा लागणें हें नसून जलबिंदु धारण करण्याची हवेची जी शक्ति असेल तिच्यापेक्षां तींत जास्त जलबिंदु अथवा जास्त वाफ येणें हें होय. म्हणून जास्त पाऊस पडण्यास विशेष महत्त्वाचें कारण हवेंत वाफ पुष्कळ येणें हें होय, व गौण कारण हवेचें उष्णतामान कमी होणें अथवा थंडी लागणें हें होय. हवा थंड असल्यानें किंवा एकाद्या ठिकाणीं थंड वारा आल्यानें पाऊस पडतो असें नेहमींच घडत नाहीं. पावसाळ्यांत जो पाऊस पडतो तो हवेंतील गारठ्यामुळें पडत नसून हवेंत पुष्कळ प्रमाणांत येणाऱ्या वाफेमुळें पडतो. हिंवाळ्यांत हवा थंड असूनही पाऊस क्वचित् पडतो हें आपणास माहीत आहे.

हिंदुस्तानांत एप्रिलपासून आक्टोबरपर्यंत नैर्ऋत्येकडून ईशान्येकडे वारे वाहातात. त्यांना नैर्ऋत्येकडील **मान्सून** किंवा नुसते **मान्सून** वारे म्हणतात. ढगाच्या दिसणाऱ्या पांढऱ्या किंवा काळ्या भागास आपण वाफ म्हणतों; परंतु ते खरोखर पाण्याचे अतिशय बारीक थेंब असतात. ज्याप्रमाणें कपड्यांत किंवा कापसाच्या बोळ्यांत पाणी मावतें, त्याप्रमाणें हवेंत हे पाण्याचे थेंब अथवा वाफ मावते. कपड्याच्या किंवा बोळ्याच्या शक्तीपेक्षां बोळ्यावर जास्त पाणी घातलें तर काय होईल? पाणी बोळ्यांत मावेल कीं खालीं गळेल? 'खालीं गळेल.' त्याचप्रमाणें वाफ धारण करण्याची अथवा मावण्याची हवेची जी शक्ति आहे तिच्यापेक्षां हवेंत जास्त वाफ आली तर काय होईल? 'ती वाफ गळेल.' ढगांत जी वाफ असते असें आपण म्हणतों ती जर पाण्याचे फार बारीक थेंब असतात, तर ही वाफ कोणत्या रूपानें हवेंतुन गळेल? 'थेंबांच्या रूपानें.' त्यासच आपण पाऊस म्हणतों. मग पाऊस पडण्यास आवश्यक कारण कोणतें? 'वाफ धारण करण्याच्या हवेच्या शक्तीपेक्षां जास्त वाफ हवेंत येणें.'

पावसाच्या आकृतींत निरनिराळ्या भागांतील पावसाचें प्रमाण पाहा. किनाऱ्यापासून जों जों दूर जावें तों तों पर्जन्यमानांत काय फरक पडतो? डोंगर व डोंगराजवळचा प्रदेश यांमध्यें पर्जन्यमानाच्या बाबतींत काय फरक दिसतो?

**उत्पन्न**—निरनिराळ्या ठिकाणच्या लोकांच्या मुख्य अन्नाविषयीं जी माहिती आपणांस मिळाली आहे, तिच्यावरून निरनिराळ्या भागांतील मुख्य धान्यें सांगा.

आकृति व पहिल्या भागांत दिलेली माहिती यांवरून निरनिराळ्या भागांतील इतर पिकें व उत्पन्न सांगा.

**उद्योगधंदे, कारखाने इ०**—निरनिराळ्या ठिकाणीं जे कारखाने पाहिले त्यावरून त्या त्या भागांतील मुख्य कारखान्यांविषयीं माहिती द्या.

शेंकडा ७० म्हणजे सुमारें दोनतृतीयांश लोक शेतकीवर उपजीविका करणारे आहेत.

**गिरण्या व कारखाने**—यासंबंधानें प्रसिद्ध अशीं शहरें मुंबई, कलकत्ता, नागपूर, कानपूर, व मद्रास हीं होत.

युरोपखंडांत युरोपियन लोक यंत्रांच्या साह्यानें पुष्कळ प्रकारचा माल तयार करितात. यंत्रानें तयार होणारा माल सुबक असून थोड्या किंमतीला पडतो. असा माल हिंदुस्तानांत येऊं लागल्यामुळें या देशांतील हातानें माल तयार करण्याचे कारखाने बसत चालले आहेत. परंतु विलायती यंत्रें आणून त्यांच्या साह्यानें माल तयार करण्याचे कारखाने एतद्देशीय लोक काढूं लागले आहेत. यंत्रांच्या साह्यानें सूत, कापड, लोखंड व धातूंचें सामान तयार करण्याचे कारखाने हिंदुस्तानांत बऱ्याच ठिकाणीं निघाले आहेत.

**कलाकौशल्याचे पदार्थ**—लोक श्रीमंत असल्याशिवाय त्यांना चैनीचे किंवा कलाकौशल्याचे पदार्थ घेण्याची ऐपत नसते. म्हणून ज्या देशांतील लोक संपन्न असतात, त्या देशामध्यें असे पदार्थ विशेष तयार होतात. पंजाब, संयुक्तप्रांत, बंगाल, गुजराथ हे प्रांत सुपीक असल्यामुळें यांतील लोक सधन आहेत. शिवाय या देशांत पूर्वी जीं मोठमोठीं राज्यें होऊन गेलीं त्यांचे राजे संपत्तिमान् व शौकी होते. यामुळें या देशांत कलाकौशल्याचीं कामें विशेष होतात. उंची वस्त्रें, कलाबतूचें काम, धातूंवरील व हस्तिदंतावरील नकशीचें काम यांविषयीं वरील देश जितके प्रसिद्ध आहेत, तितके हिंदुस्तानांतील इतर देश नाहींत. महाराष्ट्र देश व मद्रास इलाख्याचा बहुतेक भाग हे तितके सुपीक नसल्यामुळें या भागांतील लोक कमी संपन्न आहेत. यामुळें कलाकौशल्याचे कामांत हे देश इतर देशांच्या मागें आहेत. दिल्लीपासून लखनौपर्यंतचा प्रदेश सर्व हिंदुस्तानच्या कलाकौशल्याचें आगर आहे असें मानण्यास हरकत नाहीं.

मोठ्या क्षेत्रीं पुष्कळ ठिकाणचे श्रीमंत लोक येतात व तेथें मालाची विक्री पुष्कळ होते. म्हणून कांहीं क्षेत्राचे ठिकाणींही कारागिरीचे पदार्थ होतात. दिल्ली, मुर्शिदाबाद, ढाका, लखनौ, अहमदाबाद, श्रीनगर वगैरे शहरें व काशी वगैरे क्षेत्रें कलाकौशल्याचे कामाविषयीं प्रसिद्ध आहेत याचें कारण वरीलच होय.

**आगगाडीचे रस्ते**—नकाशांत पहा.

**आगगाडीचे उपयोग**—[ १ ] मनुष्यांची व मालाची त्वरित नेआण करण्यास आगगाडी विशेष उपयोगी आहे. शिवाय [ २ ] एकाद्या ठिकाणीं दुष्काळ पडल्यास तेथें परठिकाणाहून धान्य नेऊन दुष्काळाचें उग्र स्वरूप कमी करण्यास, व [ ३ ] बंड किंवा लढाई उपस्थित झाली असतां सैन्य तावडतोब नेण्यास


आगगाडीचा फार उपयोग होतो. [४] भिन्न प्रदेशांतील लोकांत दळणवळण वाढवून त्यांच्यामध्यें प्रेमभाव वाढविण्यासही आगगाडी कारण होते.

**व्यापार—**


हिंदुस्तानांतून दरवर्षी सुमारें २॥। अब्ज रुपयांचा माल परदेशीं जातो, व सुमारें २ अब्ज रुपयांचा माल परदेशांतून हिंदुस्तानांत येतो. या दोन्ही जातींच्या मालाचें प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.

हिंदुस्तानचा परदेशांशीं होणारा बहुतेक व्यापार युरोपिअनांचे हातीं आहे.

**आयात व निर्यात मालाचें स्वरूप**—हिंदुस्तानच्या निर्यात मालांत कारागिरीचे किंवा कौशल्याचे पदार्थ फारसे नाहींत. निर्यात माल बहुतेक कच्च्या मालाच्या जातीचा असतो. हिंदुस्तानांत तयार केलेल्या पक्क्या मालापैकीं मह-



त्यांचा निर्यात माल कापसाचें सूत, कापड व गोणपाटाचीं पोतीं हा होय. हिंदुस्तानचा आयात मालांत पक्का माल विशेष असतो व कच्चा माल फार थोडा असतो.




१ कच्चा माल=सृष्टीमध्यें आपोआप तयार होणारे पदार्थ; उदा० धान्यें, अशुद्ध धातु ....वगैरे. २ पक्का माल=कच्च्यामालापासून कृतीनें तयार केलेले पदार्थ; उदा०—कापड, धातूंचे पदार्थ...वगैरे.

## लोकसंख्या व लोकांच्या जाती—


हिंदुस्तानची लोकसंख्या सुमारें ३० कोट आहे. ( ही लोकसंख्या मुंबई इलाख्याच्या लोकसंख्येच्या १२ पट आहे.) लोकसंख्येपैकीं हिंदू २१ कोट, व मुसलमान ७ कोट आहेत.

**धर्म**—हिंदू, मुसलमानी, बौद्ध, शीख, जैन, पार्शी, खिस्ती व इझ्राएली (यहुदी लोकांचा ) हे हिंदुस्तानांतील मुख्य धर्म होत.

**भाषा**—हिंदुस्तानांतील महत्त्वाच्या भाषा पुढील नकाशांत दाखविल्या आहेत. हिंदी व फारशी या भाषांपासून झालेली **हिंदुस्तानी** ऊर्फ उर्दू भाषा उत्तर हिंदुस्तानांतील बरेच लोक व हिंदुस्तानच्या इतर भागांत राहाणारे मुसलमान लोक बोलतात. हिंदुस्तानांतील सर्व लोकांना साधारण अशी भाषा हीच आहे.

**राज्यव्यवस्था**—

**गव्हर्नराचे ताब्यांत**—मुंबई, मद्रास व बंगाल हे इलाखे व पंजाब, संयुक्तप्रांत, मध्यप्रांत, बहार–ओरिसा आणि आसाम हे प्रांत.




**चीफ कमिशनरांचे ताब्यांत**—वायव्य सरहद्दीवरील प्रांत, अजमीर—मेरवाडा, कुर्ग व दिल्ली हे प्रांत.

जो प्रदेश कमी महत्त्वाचा अथवा लहान असतो त्याचे भाग करून त्यांवर कमिशनर नेमतात व कमिशनरांवर–अर्थात् त्या सबंध प्रांतावर–चीफ (मुख्य) कमिशनर नेमतात.


**एतद्देशीय संस्थानें**—लहानमोठीं मिळून ६।७ शें संस्थानें हिंदुस्तानांत आहेत.


जेथें अनेक संस्थानें शेजारीं शेजारीं असतात, अशा ठिकाणीं सर्व संस्थानांवर देखरेख करण्याकरितां एक अधिकारी नेमतात. त्यास गव्हर्नर जनरलचा एजंट ( प्रतिनिधि किंवा मुखत्यार ) म्हणतात. या एजंटाशीं संबंध असणाऱ्या सर्व संस्थानांस मिळून **एजन्सी** म्हणतात. राजपुतान्यांतील सर्व संस्थानें मिळून राजपुताना एजन्सी व मध्य हिंदुस्तानांतील सर्व संस्थानें मिळून सेंट्रल इंडिया (मध्य हिंदुस्तान) एजन्सी असे भाग केले आहेत.


राजपुताना एजन्सी, मध्य हिंदुस्तान एजन्सी, व काश्मीर, बडोदें, इंदूर, ग्वाल्हेर, हैदराबाद, म्हैसूर हीं संस्थानें खुद्द गव्हर्नर जनरलचे देखरेखीखालीं आहेत. इतर संस्थानें त्या त्या प्रांतांवरील किंवा इलाख्यांवरील मुख्य अधिकाऱ्याचे ताब्यांत असतात. मोठ्या संस्थानांत **रेसिडंट** नांवाचा इंग्लिश सरकारचा अधिकारी असतो.

चीफ कमिशनर, व गव्हर्नर या सर्वांवरील अधिकारी **गव्हर्नर जनरल** ( मुख्य गव्हर्नर ) होय. त्याचा उल्लेख **गव्हर्नर जनरल** व **व्हाईसरॉय** ( राजाचा प्रतिनिधि ) **ऑफ इंडिया** अशा दुहेरी किताबानेंही कधीं कधीं करतात. तो एरवीं दिल्लीस राहातो, व उष्ण हवेच्या दिवसांत हिमालयांतील सिमला या थंड हवेच्या शहरीं राहातो.

हिंदुस्तान देश इंग्लंडचे ताब्यांत आहे. इंग्लंडचे राजे **पांचवे जॉर्ज** हेच हिंदुस्तानचे बादशाह होत. त्यांना हिंदुस्तानचे बादशाह या नात्यानें **केसर–इ–हिंद** असा किताब आहे. [केसर = बादशाह, इ = चे (षष्ठीचा प्रत्यय), इ–हिंद=हिंदुस्तानचे.]


हिंदुस्तान.
वार्षिक पर्जन्यमान
इंच.
८० चेवर
६० ते ८०
४० ते ६०
२० ते ४०
१० ते २०
० ते १०


हिंदुस्तान
चहा.
कॉफी


हिंदुस्तानांतील
पिके, झाडे, प्राणी, खनिजसंपत्ति वगैरे दाखविणारा
नकाशा.

# पहिल्या भागांत दिलेल्या स्थळांशिवाय कांहीं प्रसिद्ध स्थळें.

**पंजाब. अमृतसर**(१५२)–हें शीख लोकांचें पवित्र शहर असून एथें त्यांच्या गुरूचें प्रसिद्ध देवालय आहे. त्याच्या कांहीं भागावर सोन्याचा मुलामा केला आहे; यावरून त्यास सोन्याचें देऊळ असें म्हणतात. दिल्लीपासून थोड्या अंतरावर **पानपत** हें इतिहासप्रसिद्ध स्थळ आहे. हिंदुस्तानचे इतिहासांतील फार प्रसिद्ध अशा तीन लढाया येथें झाल्या, व त्या सर्वांमध्यें परदेशाहून आलेल्या लोकांचा जय झाला. दिल्लीचे उत्तरेस, **सिमला** (१५)—हें हिमालयांतील प्रसिद्ध थंड हवेचें ठिकाण आहे. येथें हिंदुस्तानचे गव्हर्नर जनरल उष्ण हवेचे दिवसांत हवा खाण्यास जातात. (सिमल्याची उंची ७०४८ फूट आहे.)

**संयुक्त प्रांत. आग्रा**(१८५)–हल्लींचें दिल्ली शहर शहाजहान बादशहानें स्थापन करण्यापूर्वी हें शहर मोगल बादशहांची राजधानी होतें. एथील ताजमहाल इमारत पृथ्वींतील अत्युत्कृष्ट इमारतींपैकीं आहे. ह्या इमारतीस ३ कोट रुपये लागले असावे. आग्रा येथें अकबरानें बांधलेला तांबड्या दगडांचा भव्य किल्ला पाहाण्याजोगा आहे. नैर्ऋत्येस, **फत्तेपूर–शिक्री** येथें अकबरानें बांधलेल्या फार सुंदर इमारती आहेत. **मथुरा** व **वृंदावन**–हिंदूंचीं प्रसिद्ध क्षेत्रें. **थंड हवेचीं ठिकाणें:–नैनीताल** व **मसूरी** हीं हिमालयांत आहेत.

**अयोध्या**—प्रसिद्ध शहर. रामायणांतील प्रसिद्ध रामराजा येथेंच राज्य करीत होता असें हिंदू लोक समजतात.

**बहार. गया**—या ठिकाणीं एका पिंपळाच्या झाडाखालीं बुद्ध ध्यानस्थ बसला असतां त्यास धर्मज्ञान झालें असें म्हणतात. हें प्रसिद्ध क्षेत्र आहे.

**छोटानागपूर. पारसनाथ**–हा यांतील अतिशय उंच डोंगर होय. यास जैन लोक फार पवित्र मानतात.

**ओरिसा. जगन्नाथपुरी**—येथील जगन्नाथाचें देवालय प्राचीन काळापासून फार प्रसिद्ध आहे. येथें मोठी यात्रा भरते.

**बंगाल.** भागीरथीवर **मुर्शिदाबाद** (३६)—हें शहर बंगालच्या नबाबांची शेवटची राजधानी होतें. एथें मुसलमानांची वस्ती फार आहे. रेशमाचें व कलाबतूचें काम ह्याविषयीं ह्या शहराची प्रसिद्धि आहे. (क्लाइव्हच्या वेळीं हें शहर त्या वेळच्या लंडन शहरापेक्षां जास्त सधन होतें असें क्लाइव्हनेंच म्हटलें आहे.) **दार्जिलिंग**—हें हिमालयांत उंचावर असल्यामुळें एथील हवा फार थंड आहे. युरोपियन लोक येथें उन्हाळ्यांत राहाण्यास जातात (उंची ७००० फूट). ह्याचे आसपास डोंगरांच्या उतरणीवर चहा पुष्कळपिकतो.

**मध्यप्रांत. जबलपूर** (१००)—हें मोठें व्यापाराचें शहर व रेल्वेजंक्शन आहे. जबलपुरापासून ११ मैलांवर नर्मदा नदी ज्या ठिकाणीं संगमरवरी खडकांतून वाहात गेली आहे, तें स्थळ फारच रम्य आहे.

**पंचमढी**—हें सातपुड्यांतील थंड हवेचें ठिकाण आहे.

**अमरावती** (३४)—येथें कापसाचा व्यापार मोठा चालतो.

**मद्रास इलाखा**—बल्लारीचे वायव्येस ३५ मैलांवर तुंगभद्रेच्या कांठीं प्राचीन काळचें प्रसिद्ध **विजयानगर** शहर होतें.



मद्रासी गृहस्थ.

या शहराचें क्षेत्र २४ चौ• मैल होतें असें त्या वेळच्या एका प्रवाशानें लिहिलेलें आहे. या शहराचे मोडकेतोडके भाग विस्तीर्ण प्रदेशांत पसरलेले आहेत, ते पाहाण्यासारखे आहेत.

**[मद्रासचे दक्षिणेकडील शहरें] तंजावर** (५४)—एथील देवालयें, कलाकौशल्याचीं कामें व संस्कृत ग्रंथांचा संग्रह हीं प्रसिद्ध आहेत. तंजावरचे ईशान्येस, **कुंभकोणम्** (६०)—हें प्रसिद्ध क्षेत्र आहे. एथें विद्वान् हिंदू पंडितांची वस्ती आहे. तंजावरचे पश्चिमेस, **त्रिचनापल्ली** (१२३)—एथील किल्ला इतिहासप्रसिद्ध आहे. येथें चिरूट व विड्या ह्यांचे मोठे कारखाने आहेत. येथें चांदीसोन्याचें कामही उत्तम होतें. नैऋत्येस, **मदुरा** (१३४)—एथील प्रचंड शिवालय फार प्रसिद्ध आहे. **उटकमंड**—हें निलगिरीवरील थंड हवेचें प्रसिद्ध ठिकाण आहे. एथें मद्रासचा गव्हर्नर उन्हाळ्यांत राहातो.

---

## हिंदुस्तान सरकारचे ताब्यांतील संस्थानें.

### काश्मीर.



काश्मिरी ब्राह्मण.

ह्यांतील हवा थंड व आल्हादकारक आहे. अनेक प्रकारचीं फळें, केशर, गुलाबी अत्तर, देवदाराचें लाकूड हे ह्या प्रांतांतील महत्त्वाचे जिन्नस होत. प्राचीन काळापासून एथील शालींची फार प्रसिद्धि आहे. कशीदा व रेशमी वेलबुट्टी काढण्यांत काश्मिरी लोकांइतके कुशल लोक हिंदुस्तानांत इतरत्र नाहींत.

काश्मिरी स्त्रिया सौंदर्याविषयीं प्रसिद्ध आहेत.

**श्रीनगर** (१२६)—हें शहर या संस्थानची राजधानी होय. एथील सोन्यावरील व तांब्यावरील नकशीच्या कामाची प्रसिद्धी आहे. या शहरास **काश्मीर** असेंही म्हणतात.

---

## २ राजपुताना एजन्सी.

**मुख्य संस्थानें:**—

**उदेपूर** ऊर्फ **मेवाड संस्थान**—

राजधानी—**उदेपूर** (४५).

**चितोड** [चितूर]—एथील किल्ला प्रसिद्ध आहे. हें शहर पूर्वीं ह्या राज्याची राजधानी होतें. चितोडगड ह्या इतिहासप्रसिद्ध किल्ल्याच्या पायथ्याशीं हें शहर आहे.

उदेपूरच्या राजास राणा म्हणतात. या राजाचें घराणें फार प्राचीन आहे व त्याग रजपुतांमध्यें फार मान आहे.

**जोधपूर** ऊर्फ **मारवाड संस्थान**—

ह्यांत संगमरवरी दगडांच्या खाणी आहेत. ह्या संस्थानांतील लोकांस मारवाडी म्हणतात. ते व्यापाराच्या कामांत कुशल असल्याबद्दल त्यांची प्रसिद्धि आहे. हिंदुस्तानच्या बहुतेक सर्व भागांत आढळणारे धाडसी हिंदू व्यापारी हेच आहेत. राजधानी **जोधपूर** (५०).



रजपूत.

---

## ३ सेंट्रल इंडिया एजन्सी.

**ग्वाल्हेर**--हें मध्यहिंदुस्तानांतील सर्वांत मोठें संस्थान आहे. राजधानी **ग्वाल्हेर** ऊर्फ **लष्कर** (१०४)-एथील किल्ल्याची लांबी दीड मैल असून तो फारच पाहाण्यासारखा आहे. दक्षिणेस, **उज्जयिनी**-माळवा प्रांताची प्राचीन राजधानी. हिंदुस्तानांत प्राचीनकाळीं प्रख्यात असलेल्या शहरांपैकीं हें शहर आहे. हेंच शहर प्रसिद्ध विक्रम राजाची राजधानी होतें. बारा ज्योतिर्लिंगांपैकीं 'महाकाळ' नांवाचें प्रसिद्ध ज्योतिर्लिंग येथें आहे म्हणून हें एक क्षेत्र आहे. हें संस्थान शिंदे नांवाच्या मराठे राजाचे ताब्यांत आहे. त्यास 'महाराज' ही पदवी आहे.

**इंदूर संस्थान**-राजधानी **इंदूर** (९२). हें संस्थान होळकर आडनांवाच्या धनगर जातीच्या मराठे राजाच्या ताब्यांत आहे. त्यास 'महाराज' हा किताब आहे.

**भोपाळ संस्थान भोपाळ** (७०)-राजधानी. हें संस्थान मुसलमानी आहे व ह्याच्या गादीवर हल्लीं स्त्री आहे. तीस 'बेगम' असें म्हणतात.

---

## ४ बडोदें.

गुजराथच्या मध्यभागांतील सुमारें ८००० चौरस मैलांचा प्रदेश बडोदें संस्थानांत येतो.

हें संस्थान गायकवाड आडनांवाच्या मराठे राजाचे ताब्यात आहे. त्यास 'महाराज' असा किताब आहे.

या संस्थानांतील मुलूख फार सुपीक आहे. उत्पन्न १॥ कोट या संस्थानांत प्राथमिक शिक्षण मोफत (फीशिवाय) देण्याची व्यवस्था केली आहे. राजधानी **बडोदें** [२०३]--एथील राजवाडें व पदार्थसंग्रहालय (अजबखाना) हीं पाहाण्यासारखीं आहेत.

---

## ५ हैदराबाद संस्थान ( निजामचें राज्य ).

**शहरें. हैदराबाद** (५००)—हें शहर या संस्थानाची राजधानी होय. यांत पुष्कळ अरब व पठाण लोकांची वस्ती आहे. लोकसंख्येच्या मानानें हें शहर हिंदुस्तानांत चवथ्या नंबरचें आहे. येथें पाहाण्यासारख्या पुष्कळ इमारती आहेत. हैदराबादचें उत्तरेस सहा मैलांवर **शिकंदराबाद** येथें हिंदुस्तानांतील सर्वांत मोठी छावणी आहे. पूर्वीं हिऱ्यांविषयीं प्रसिद्ध असलेलें **गोवळकोंडा** शहर हैदराबादचे जवळच आहे. एथील जुन्या इमारती पाहाण्यासारख्या आहेत.

वायव्यभागीं, **औरंगाबाद** (२६) हें औरंगजेबाचें आवडतें शहर होतें. एथें त्याच्या मुलीचें ( कांहींच्या मतें बायकोचें ) थडगें आहे. तें ताजमहालाच्या नमुन्यावर बांधलेलें असून पाहाण्यासारखें आहे.

**दौलताबाद**—एथील किल्ला पाहाण्यासारखा आहे. एथून सात मैलांवर **वेरूळ** म्हणून गांव आहे, त्याचे जवळील डोंगरांत कोरींव **लेणीं** आहेत, तीं फारच भव्य असून जगांत प्रसिद्ध आहेत. तीं आठव्या शतकापूर्वीं बांधलीं असें म्हणतात. वेरुळापासून थोड्या अंतरावर असलेल्या अजिंठ्याचे डोंगरांतील **अजिंठ्याचीं** कोरींव **लेणीं** व त्यांतील रंगीत चित्रें पाहाण्यासारखीं आहेत.

---

## ६ म्हैसूर.

**शहरें. म्हैसूर** (८४) राजधानी. म्हैसूरचे उत्तरेस **श्रीरंगपट्टण** शहर आहे, तें टिपूची राजधानी होतें. पूर्वभागीं **बंगलोर** (२३८) शहर; येथें फौजेची छावणी आहे.

हें संस्थान एका क्षत्रिय राजाचे ताब्यांत आहे. त्यास 'चामराजेंद्र वडियर महाराज' असा किताब आहे.

---

## स्वतंत्र संस्थानें ( नेपाळ व भूतान ).

### १ नेपाळ.



कस्तूरीमृग.

हा प्रदेश अतिशय डोंगराळ असू यांत हिमालयाच अत्युच्च शिखरें आ हेत. त्यांपैकीं एव रेस्ट, गौरीशंकर व धवलगिरि हीं मुख होत.

नेपाळांत एक प्रकारचें हरिण आहे, त्याचे बेंबींत कस्तूरी सांपडते.

**लोक**—एथील लोकांस गुरखे म्हणतात. ते अतिशय बळक व कंटक असून फार शूर आहेत. ते मूळचे काश्मिरांतील रजपू होत. त्यांनीं सुमारें दीडशें वर्षांपूर्वी हा देश काबीज करून ये राज्य स्थापन केलें. गुरखे लोक हिंदुधर्मी आहेत.

**राजधानी—काटमांडू** (५०).

### २ भूतान.

देश डोंगराळ आहे. भूतानी लोक बुद्धधर्मी आहेत.

क्र. 2074



REFBK-0002415

REFBK-0002415

# खालील पुस्तकें आमचेकडे मिळतात.

| | | |
|---|---|---|
| ग्रीनलंडवर्णन | .... | ०-५-० |
| महाराष्ट्रभूवर्णन | ... | ०-४-० |
| पुणें जिल्ह्याचें भूवर्णन | .... | ०-२-६ |
| भूवर्णन भाग १ ला—विद्यार्थ्यांकरितां. | ... | ०-४-६ |
| भूवर्णन भाग १ला यांतील शिक्षकांकरितां माहिती. | | ०-१-० |
| भूवर्णन भाग २ रा—विद्यार्थ्यांकरितां. | ... | ०-६-६ |
| भूवर्णन भाग ३ रा | ... | ०-१३-० |
| व्यायामशास्त्र | .... | ०-८-० |
| आपले भाऊबंद अथवा जगाची ओळख | .... | ०-६-० |
| नवीन मोडी पहिलें पुस्तक ( प्रायमर ) पटवर्धनकृत. | ... | ०-१-९ |
| मोडी पहिलें—पटवर्धनकृत. ... | ... | ०-३-६ |
| मोडी तिसरें— ,, ... | ... | ०-७-० |
| मोडी दुसरें—सरकारी ... | ... | ०-४-० |
| गोगटेकृत शालोपयोगी हिंदुस्तानचा इतिहास. | | १-४-० |
| लिमयेकृत अंकगणित—भाग १ ला. | ... | ०-५-० |
| ,, ,, —भाग २ रा. .. | ... | ०-९-० |
| ,, ,, —भाग ३ रा. ... | ... | १- -० |
| गोखलेकृत अंकगणित—भाग १ ला. | .... | — |
| ,, ,, —भाग २ रा. .... | ... | ०-९-० |
| ,, ,, —भाग ३ रा. ... | ... | १-०-० |
| महाराष्ट्र देशाचा इतिहास. ... ... | ... | ०-४-० |
| बोरवणकरकृत गोष्टीरूप इतिहास. ... | ... | ०-४-३ |
| बालबोध व्याकरण जोशीकृत—भाग १ ला. | ... | ०-४-० |
| ,, ,, ,, —भाग २ रा. | .... | ०-[illegible] |
| निबंधमुक्ताहार. ... ... | ... | १-[illegible]-० |

यांशिवाय सर्व प्रकारचीं शालोपयोगी बालबोध क्रमिक पुस्तकें, किस्से, पोथ्या, ग्रंथ, मनोरंजक कादंबऱ्या, वगैरे पुस्तकें आमचेकडे विकत मिळतात. पुस्तकांचे व्यापारी व शाळामास्तर यांस योग्य व भरपूर कमिशन मिळेल.

**लक्ष्मण नारायण गोडबोले, बुकसेलर, बुधवार, पुणें.**